दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ७६ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.१२ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



Agro Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क




राजमाता जिजाऊ
मासाहेब जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
–संपादक



स्वामी विवेकानंद
जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
–संपादक

# एकत्र लढण्यासाठी काँग्रेसचा पुढाकार:ठाकरेंची चर्चा करण्याची विजय वडेट्टीवारांची तयारी

## नसता शरद पवारांच्या पक्षासोबत लढणार–वडेट्टीवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्वबळावर लढणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. मात्र, तरी देखील आम्ही उद्धव ठाकरे यांनी भेट घेऊन त्यांना एकत्र येण्याची विनंती करणार असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर दिल्लीत 'I.N.D.I.A.' आघाडी अजूनही मजबूत असल्याचा दावा देखील वडेट्टीवार यांनी केला आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवरुन राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकिकडे स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढण्याची घोषणा करत, इंडिया आघाडी तुटण्याचे संकेत संजय राऊत यांनी दिले आहेत. तर दुसरीकडे इंडिया आघाडी मजबूत असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला आहे. त्यामुळे आता या सर्व घडामोडींकडे राज्याचे लक्ष लागले आहे.



या संदर्भात विजय वडेट्टीवार म्हणाले की, इंडिया आघाडी अजूनही मजबूत आहे. दिल्लीमध्ये इंडिया आघाडी एकत्रीत काम करत आहे. महाविकास आघाडी म्हणून आम्ही लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र लढलो होतो. तसेच आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील एकत्रीत लढवण्याचा आमचा प्रयत्न असेल. संजय राऊत हे त्यांच्या पक्षाचे मोठे नेते आहेत. त्यांनी स्वबळावर निवडणुका लढण्याची घोषणा केली असली तरी आम्ही उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांना एकत्र लढवण्याची आम्ही विनंती करणार असल्याची माहिती देखील वडेट्टीवार यांनी केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका उद्धव ठाकरे यांच्यासोबत महाविकास आघाडी म्हणून लढवण्याचा आमचा प्रयत्न असेल. ते सोबत आले नाही तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत आम्ही निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची माहिती वडेट्टीवार यांनी दिली. ठाकरेंना विनंती करु, ते सोबत आले तर ठिक नसता आमचा मार्ग मोकळा असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि आमचा काँग्रेस पक्ष यांची नैसर्गिक आघाडी कायमस्वरूपी राहिली आहे. जर उद्धव ठाकरे यांनी ऐकलेच नाही तर आम्ही दोघे मिळून या निवडणुकीला सामोरे जाण्याचा प्रयत्न करू, असे देखील ते म्हणाले.विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे खापर फोडत विजय वडेट्टीवार यांनी नाना पटोले आणि संजय राऊत यांच्यावर चर्चेला उशीर लावल्याचा आरोप केला होता. मात्र, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला असल्याचा दावा आज वडेट्टीवार यांनी केला आहे. नाना पटोले आणि संजय राऊत हे चर्चेत होते. मी देखील या चर्चेत होतो. मात्र, यात चर्चेचे गुऱ्हाळ लांबत गेल्याने आम्हाला प्रचाराला कमी वेळ मिळाल्याचे मी म्हणालो होतो. मात्र, त्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला असल्याचेही वडेट्टीवार यांनी केला आहे.

### संजय राऊत हे रिकामटेकडे, ते रोजच काहीतरी मत व्यक्त करतात

# ठाकरे गटाच्या स्वबळाचा विषय देवेंद्र फडणवीसांनी एकाच शब्दात संपवला

**मुंबई (वृत्तसंस्था)**– संजय राऊत हे रिकामटेकडे आहेत. ते रोजच काहीतरी मत व्यक्त करतात. मात्र त्यांच्या मतावर मी व्यक्त व्हायलाच पाहिजे असे नाही. मला कामे असतात. मी रिकामटेकडा नाही. अशा कडक शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांच्या स्वबळाच्या घोषणेवर प्रतिक्रिया दिली आहे. ते नागपूर येथे बोलत होते.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्वभावावर लढवणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. मुंबईपासून नागपूरपर्यंत सर्वच महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका शब्दात उत्तर दिले आहे. त्यांच्या या घोषणेवर काहीही बोलण्यास मुख्यमंत्र्यांनी नकार दिला आहे.



लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष यांनी एकत्र निवडणूक लढवली होती. महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढवलेल्या निवडणुकीत लोकसभेत या तीनही पक्षांना चांगले यश मिळाले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला आहे. या परभावानंतर महाविकास आघाडी टीकते का? असे प्रश्न उपस्थित केला जात होता. त्यातच आता संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. त्यामुळे राऊत यांची ही घोषणा म्हणजे महाविकास आघाडी अस्तित्वात राहणार नसल्याचे संकेत मानले जात आहे.

मुंबई ते नागपूर्यंत सर्व महानगर पालिका, जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. उद्धव ठाकरे यांनी आम्हाला स्वळावर लढण्याचे सांगितले आहे. या संदर्भात आम्ही पदाधिकाऱ्यांशी तशी चर्चा केली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्हाला देखील पाहायचे आहे की काय होते? असे देखील ते म्हणाले. आघाडीमध्ये लढताना कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही. त्याचा पक्षाच्या वाढीला देखील फटका बसतो. त्यामुळे महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषदेमध्ये आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.या संदर्भात काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, इंडिया आघाडी अजूनही मजबूत आहे. दिल्लीमध्ये इंडिया आघाडी एकत्रीत काम करत आहे. महाविकास आघाडी म्हणून आम्ही लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र लढलो होतो. तसेच आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील एकत्रीत लढवण्याचा आमचा प्रयत्न असेल. संजय राऊत हे त्यांच्या पक्षाचे मोठे नेते आहेत. त्यांनी स्वबळावर निवडणुका लढण्याची घोषणा केली असली तरी आम्ही उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांना एकत्र लढवण्याची आम्ही विनंती करणार असल्याची माहिती देखील वडेट्टीवार यांनी दिली आहे.

# रवींद्र चव्हाण भाजपचे नवे कार्यकारी अध्यक्ष

**मुंबई (वृत्तसंस्था)**– भाजप नेते आणि माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे. रविंद्र चव्हाण यांची भाजप महाराष्ट्राचे कार्यकारी प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी ही नियुक्ती केली आहे. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे रविंद्र चव्हाण यांच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मंत्रिपदाची शपथ घेतली. पण भाजपचे ज्येष्ठ नेते रवींद्र चव्हाण यांना मंत्रिपद न मिळाल्याने ते पक्ष-संघटनेत प्रदेशाध्यक्ष होणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यावर अखेर आज शिक्कामोर्तब झाले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या पत्राद्वारे शिर्डीतील भाजपच्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे एकनाथ शिंदे सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून कार्यरत होते. सलग चौथ्यांदा डोंबिवली विधानसभेतून निवडून आलेले आहेत. मात्र, यंदा त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये स्थान



मिळाले नाही. दुसरीकडे भाजपचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला असून महसूल मंत्रिपद मिळाले आहे, त्यानंतर आता रवींद्र चव्हाण यांना महाराष्ट्र भाजपच्या कार्यकारी अध्यक्षपद मिळाले आहे.

# संजय राऊत यांचे संतुलन बिघडले:तर मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पाहणारे आता घरी बसले–मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**मुंबई (वृत्तसंस्था)**– नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना नाकारले आहे. मात्र, आता हे तिन्ही पक्ष स्वतंत्र निवडणूक लढो किंवा एकमेकांच्या डोक्यावर बसून लढो, याची आम्हाला चिंता नसल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे. विखे पाटील यांनी या माध्यमातून खासदार संजय राऊत यांनी दिलेल्या स्वबळाच्या नाऱ्यावर टीका केली आहे. आम्हाला विधानसभा निवडणुकीमध्ये ज्याप्रमाणे विजय मिळाला, तसाच विजय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील मिळणार असल्याचा दावा देखील विखे पाटील यांनी केला आहे.

संजय राऊत यांना केवळ मुद्दा हवा असतो. त्यांनी आता स्वतःचे अस्तित्व गमावले आहे. राऊत यांचे संतुलन बिघडले असल्याचा आरोप देखील विखे पाटील यांनी केला. संजय राऊत यांचे माझ्यावर विशेष प्रेम आहे. त्यांचे संतुलन बिघडण्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे न जाता उद्धव ठाकरे यांचा शिवसेना पक्ष स्वबळावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर आता राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. त्यात भाजपने देखील स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुकांमध्ये मोठे यश मिळणार असल्याचा दावा विखे पाटील यांनी केला आहे.

महाविकास आघाडीची बिघाडी होण्यास जास्त वेळ लागणार नसल्याचे मी या आधी देखील सांगितले होते. आघाडी ही भूमिका आणि तत्व यासाठी एकत्र आलेले नाही. तर केवळ सत्तेत येण्यासाठी महाविकास आघाडीतील पक्ष एकत्र आले होते. त्यासाठी कोणी हिंदुत्व बाजूला सोडले तर कोणी आपल्या विचारधारेला बाजूला ठेवले



असल्याची टीका राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे. मात्र आता सत्ता गेल्याबरोबरच महाविकास आघाडीतील मतभेद समोर येण्यास सुरुवात झाली असल्याचा आरोप त्यांनी केला.

भारतीय जनता पक्षाच्या पाठीमध्ये खंजीर खुपसून उद्धव ठाकरे हे सत्तेत सहभागी झाले होते. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत खोटे नरेटीव्ह सेट करून त्यांनी विजय संपादित केला. मात्र, विधानसभेला त्यांचा तो खोटा नरेटीव्ह सेट झाला नसल्याचा दावा विखे पाटील यांनी केला आहे. त्यामुळेच मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पाहणारे आता घरी बसले आहेत. काँग्रेस पक्षाचे तर अस्तित्वच रोहिले नसून त्या बद्दल मी सांगण्याचे काहीही कारण नसल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकापर्यंत देखील महाविकास आघाडी राहील, अशी स्थिती नसल्याचा दावा विखे पाटील यांनी केला आहे.आगामी निवडणुका भाजप स्वबळावर लढणार का? असाही प्रश्न विखे पाटील यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना विखे पाटील यांनी उत्तर देण्यास नकार दिला. तो माझा अधिकार नसल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. महायुती सोबत लढायचे की, स्वबळावर लढायचे? या सर्वांचा निर्णय भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते घेतील. महायुतीमध्ये सोबत असणाऱ्या सर्व घटक पक्षांचे प्रमुख नेते याबाबतचा निर्णय घेणार असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

# शेंद्रा-नगर रस्ता ६ पदरी होणार; २.५ तासांत संभाजीनगर-पुणे प्रवास शक्य

### रस्त्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या उद्योगमंत्री सामंत यांच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–शेंद्रा, बिडकीन, अहिल्यानगर, शिरूर ते पुणे या महामार्गाला शासनाची मंजुरी मिळाली आहे. शेंद्रा ते अहिल्यानगर रस्ता चौपदरीऐवजी सहापदरी करावा, अशी मागणी खासदार संदिपान भुमरे व उद्योजकांनी केली. त्याची उद्योगमंत्री उदय सामंत यांनी त्वरित दखल घेऊन रस्त्याचा प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. हा महामार्ग पूर्ण झाला तर केवळ अडीच तासांत पुणे गाठणे शक्य होणार आहे. त्यामुळे उद्योग, व्यवसाय, पर्यटनाला चालना मिळेल. उद्योगाला चालना देण्यासाठी रस्ते विकासाचे जाळे मजबूत करण्यात येत आहे. त्यानुसार शेंद्रा, बिडकीन, वाळूज, समृद्धी महामार्ग, अहिल्यानगर, शिरूर, पुणे अशा प्रकारे दळणवळणाच्या कनेक्टिव्हिटीसाठी 'एक्स्प्रेस वे'ला ऑगस्ट २०२४ मध्ये सरकारने मंजुरी दिली आहे.'एक्स्प्रेस वे'च्या कामाचा



आढावा सुरू असताना खासदार भुमरे व काही उद्योजकांनी हा २७ किलोमीटरचा रस्ता चौपदरीऐवजी सहापदरी करण्याची आग्रही मागणी केली. त्याची दखल घेऊन उद्योगमंत्री सामंत यांनी रस्ता सहापदरी करण्याचे निर्देश दिले. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन या प्रस्तावाला मान्यता घेतली जाणार असल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले. या रस्त्यासाठी भूसंपादनासह मंजुरी घेणे, सर्वेक्षण पूर्ण करणे आदींचा प्रस्ताव तयार करण्यास सांगितले.

# पुण्यात तरुणीला मारल्याची वाईट घटना घडली राज्यात हे सर्वत्र सुरू–पंकजा मुंडेंचा दावा

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**– पुण्यात तरुणीला मारल्याची एक वाईट घटना घडली. सध्या राज्यात सगळीकडेच अशा घटना घडत आहेत. त्यामुळे भांडण अथवा खून आदी घटनांवरून राजकारण करणाऱ्यांसाठी सध्या मोठी संधी आहे, असे मत राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी शनिवारी बीडमधील संतोष देशमुख हत्याकांवर भाष्य करताना व्यक्त केले. सुरेश धस यांच्यामुळे बीडची बदनामी होत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

पंकजा मुंडे छत्रपती संभाजीनगरमध्ये पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींना मकोका लावण्यात आल्याची माहिती माझ्याकडे नाही. त्यामुळे मी त्यावर काय प्रतिक्रिया देऊ? मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला असेल तर तो योग्यच आहे. तपासावर बोलणे योग्य ठरणार नाही. पुण्यात काल एक वाईट घटना घडली. एका तरुणीला ठार मारण्यात आले. हे सगळीकडेच घडत आहे. कोणतीही घटना घडते. भांडण अथवा खून याचे ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांच्यासाठी ही संधी आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यावर मी काउंटर करणार नाही. शोध लागेपर्यंत कारवाई करणार नाही असे ते म्हणालेत. ते असे म्हणत असतील तर मी रोज काय बोलू? आमदार सुरेश धस यांच्यावर मी काय बोलू? मी कुठे गप्प आहे. मी स्वतः या प्रकरणी पहिल्यांदा एसआयटीची मागणी केली होती. माझ्या बोलण्यामुळे राज्य हलले असते तर आता जे ते बोलत आहेत, ते पूर्वी का बोलले नाही. मागच्या २ वर्षांत का बोलले नाही. त्यांच्यामुळे बीड बदनाम होत आहे. त्यांनी राजकीय भूमिका न घेता हा विषय संवेदनशीलपणे समजून घेतला असता तर बीडची अशी बदनामी झाली नसती.आमच्या जिल्ह्यात स्वाभिमानी लोक आहेत. मी महिला राजकारणी म्हणून तिथे काम करते. सर्वात कष्टाचे जीवन असणारे लोक आमच्या जिल्ह्यात आहेत. आम्ही काम करतो. आता सांगितली जात आहे तशी स्थिती असती तर आम्ही दरोडे टाकायला गेलो असतो ना? अशा घटनेने जिल्हा बदनाम होत असेल तर आरटीआयमधून माझ्याकडे सर्व जिल्ह्यांची माहिती आहे. नागपूरची घटना काय, पुण्याची काय असे सगळीकडेच घडत आहे. विशेषतः मी पर्यावरण मंत्री आहे. त्यामुळे मी या विषयावर काय बोलणार. मुख्यमंत्री या प्रकरणी योग्य ती भूमिका मांडत आहेत, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.पंकजा पुढे म्हणाल्या, मी माझ्या विभागाची बैठक घेत आहे. माझ्या खात्याला बळ देण्याचे काम करत आहे. मी उगीच आपल्या अधिकाऱ्यांना झापले वगैरे नाही. मी त्यांना समजून घेतले. माझे मागे अशीच गर्दी आहे. कमी जास्त असे काही झाले नाही. प्रदूषण हा विषय राज्यापुरता नाही तर जागतिक पातळीवरचा विषय आहे. मी देश व परदेश सगळीकडून मार्गदर्शन घेत आहे.

# मॉडेल कॉन्व्हेन्ट एन्ड विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय गोरेगावमध्ये दोन दिवसीय स्नेहसंमेलनाचे आयोजन

## प्रतिबिंब २०२५: वार्षिक स्नेहसंमेलनाचा विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा मंच

**भंडारा । प्रतिनिधी**

मॉडेल कॉन्व्हेन्ट आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगाव येथे दोन दिवसीय प्रतिबिंब २०२५ वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. या भव्य कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत शाळेच्या सांस्कृतिक वारशात नवा अध्याय जोडला. शाळेच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या मान्यवर, शिक्षक, आणि पालक यांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान .एस. एच. भैरम उपप्राचार्य जगत कॉलेज गोरेगांव,तर उद्घाटक अजय भुसारी पोलिस निरीक्षक पोलिस मुख्यालय गोरेगांव, विशेष अतिथी प्रीती लांडे पोलिस उपनिरीक्षक, आर. डी.कटरे सचिव मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगांव, सुरेखा आर.कटरे संचालिका मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगांव, .आर.आर.अगडे , राहुल कटरे गोरेगांव, . सुनील आवळे गोंदिया, . प्रफुल भालेराव गोंदिया, वैभव आर्.कटरे संचालक मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगांव, दीप्ती कटरे संचालिका मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगांव, वाहिधे मॅडम गोरेगांव, दामेश्वर बोपचे उपाध्यक्ष पा.शी.संघ मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगांव, . भरत तुप्पट सदस्य पा.शी.संघ, मुकेश तुमलाम सदस्य पा.शी.संघ, मुनेश्वर येळणे सदस्य पा.शी.संघ, कविता लीचडे पत्रकार गोरेगांव, उपस्थित होते.

स्नेहसंमेलनाची सुरुवात देशभक्ती व विद्येचे प्रतीक म्हणून भारतमाता, देवी सरस्वती, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उद्घाटक अजय भुसारी यांनी फीत कापून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन केले.

शाळेच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या शिक्षक व इतर मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी शाळेच्या संस्थापकांपासून आतापर्यंत योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

सत्कारमूर्तींमध्ये अजय भुसारी, पोलीस निरीक्षक, गोरेगाव, रविकांत लांजेवार, माझी मुख्याध्यापक, मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगाव, अभय कसारे, मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, गोरेगाव, अंकुश चौहान, मॅनेजर, बुलढाणा अर्बन बँक, छाया पी. मेश्राम, प्राचार्य, मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगाव, सी. बी. पटले, प्रशासकीय अधिकारी, सविता टी. इळपाचे, पर्यवेक्षिका, नमिता मुनेश्वर कटरे, आणि शालू आर. कुंभरें, कर्मचारी, मॉडेल कॉन्व्हेन्ट गोरेगाव यांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांचे मन जिंकले. मराठी लोककला सादर करणारे लावणी, कोळी नृत्य, देशभक्तीपर गीते, आणि शिक्षणविषयक संदेश देणारी नाटिका या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्य ठरले.

सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे होणाऱ्या दुष्परिणामांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नाट्यप्रयोग उपस्थितांवर प्रभाव पाडणारे ठरले. त्याचबरोबर, पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोककला व नृत्यांनी वातावरण अधिकच रंगतदार झाले.

शाळेत १००% उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना विशेष मेडल प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमितता आणि शिस्त याबद्दल जागरूकता निर्माण झाली.

शाळेला प्रगतीपथावर नेण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच शाळा शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या यशस्वी ठरल्याचे संस्थेच्या संचालकांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन वर्ग १० वीचे विद्यार्थी निधी राहुल कटरे व निषाद चंदनकुमार पटले यांनी केले. त्यांच्या प्रभावी सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला नवा जोश मिळाला. कार्यक्रमाच्या समारोपाला तृप्ती विजयकुमार दानी यांनी मनःपूर्वक आभार प्रदर्शन केले.

प्रतिबिंब २०२५ या वार्षिक स्नेहसंमेलनाने विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचा एक महत्त्वपूर्ण मंच दिला. या कार्यक्रमाने केवळ सांस्कृतिक प्रदर्शन न होता, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण केली. या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी उत्तम संधी मिळाली. तसेच शिक्षक, पालक, व मान्यवरांच्या प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांच्या मनात नवीन ऊर्जेचा संचार झाला.

# नगर पंचायतीची धाडसी कारवाई,प्लास्टिक मुक्त कर्जत करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत नगरपंचायतीने प्लास्टिक मुक्त कर्जत करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मुख्याधिकारी अक्षय जायभाय यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्लास्टिकच्या वापरावर कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. यासाठी त्यांनी आज कर्जत शहरातील विविध व्यापाऱ्यांवर धाडसी कारवाई केली. यामध्ये नगरपंचायतीचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते, ज्यांनी अनेक दुकानांमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणार्या व्यापाऱ्यांवर त्वरित कारवाई



या कारवाईला पर्यावरण प्रेमींनी स्वागत केले आहे. कर्जत शहराच्या स्वच्छतेसाठी आणि सुंदरतेसाठी नगरपंचायतीने वेळोवेळी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली जात होती. याआधी काही दिवसांपासून कारवाई थोडी मंदावली होती, परंतु मुख्याधिकारी अक्षय जायभाय यांनी शिस्तीची भूमिका घेतली असून त्याने ठरवले आहे की कर्जत शहरात प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे नियंत्रण ठेवले जाईल.

मुख्याधिकारी अक्षय जायभाय यांनी दोन दिवसांपूर्वी थकबाकीदार व्यापाऱ्यांकडून वसुलीची मोहीम सुरू केली होती, आणि आता प्लास्टिकच्या वापरावर लक्ष केंद्रित करून शहराला स्वच्छ ठेवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. या योजनेमध्ये चहाच्या टपऱ्यांवर वापरल्या जाणार्या प्लास्टिक ग्लासवरही कारवाई होणार आहे, कारण हे ग्लास आरोग्यास धोका निर्माण करत आहेत. यामुळे हॉटेल आणि चहा विक्रेते यांना काचेचे किंवा कागदी ग्लास वापरण्याची सूचना देण्यात आली आहे. प्लास्टिक मुक्त कर्जत बनवण्यासाठी नगरपंचायतीची ही धाडसी कारवाई शहराच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे मानले जात आहे.

# ५२ वे पारनेर तालुकास्तरीय विज्ञान-गणित-पर्यावरण प्रदर्शन नुकतेच संपन्न

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर तालुकास्तरीय विज्ञान गणित पर्यावरण प्रदर्शनात सुजय अजित सांगळे याने प्रथम क्रमांक मिळविल्याबदल नंदकुमार झावरे पाटील को आप क्रेडिट सोसायटीच्या वतीने चेअरमन पारनेर पंचायत समिती माजी सभापती राहुल झावरे व व्हा.चेअरमन संचालक मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला.व जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.५२ वे पारनेर तालुकास्तरीय विज्ञान –गणित –पर्यावरण प्रदर्शन पंचायत समिती (शिक्षण विभाग )पारनेर व विज्ञान –गणित अध्यापक संघटना पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भाळवणी या ठिकाणी नुकतेच गणित –विज्ञान–पर्यावरण प्रदर्शन संपन्न झाले. या प्रदर्शनामध्ये तालुक्यातील सर्व शाखा शाळांमधून अनेक विद्यार्थ्यांनी आपले विज्ञान– गणित– पर्यावरण यासंबंधीचे



उपकरण सादर केले होते .यामध्ये श्री दुर्गादेवी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी मधील विद्यार्थी चि. सुजय अजित सांगळे यांने साखर कारखान्यातील दुषीत पाण्याचे जलशुद्धीकरण उपकरण हे निर्माण केले होते . या उपकरणास इयत्ता. सहावी ते आठवी गटातून प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दलमा.आ. नंदकुमार झावरे पाटिल मल्टीस्टेट पतसंस्थेच्या वतीने चि. सुजय सांगळे यांचा सन्मान करण्यात आला. नंदकुमार झावरे पाटिल मल्टीस्टेट को आप क्रेडिट सोसायटी चेअरमन माजी सभापती राहुल झावरे व्हा.चेअरमन संजय जाजगे संचालक सिताराम खिलारी सर डा बी.एच झावरे ,डा रंगनाथ आहेर डा महेश नगरकर, भास्कर झावरे,सौ.प्रिया झावरे, यश झावरे प्रा नितिन पानसरे , प्रा.संजय कोल्हे,अजित सांगळे,व्यवस्थापक किशोर भांबरकर यांनी अभिनंदन केले

# साईनगरी शिर्डीत भाजपचे भव्य अधिवेशन! केंद्रीय नेतृत्व करणार पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी येथे होणाऱ्या या अधिवेशनात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात सुमारे १५ हजारांहून अधिक पदाधिकारी उपस्थित राहणार असून केंद्रीय नेतृत्व त्यांना मार्गदर्शन करणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपचे सर्व मंत्री, आमदार, खासदार या अधिवेशनात उपस्थित असतील.



जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर अधिवेशनाच्या तयारीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्वाचे ठरणार आहे. या अधिवेशनात निवडणूकीची रणनिती ठरण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

# नवीन वर्षाचा नवीन संकल्प असावा : डॉ.कांकरिया जिल्हा कारागृहातील बंदी बांधवांना ब्लँकेटचे वाटप

**राहुरी । प्रतिनिधी**

नवीन वर्षाचा नवीन संकल्प असावा.यंदाच्या वर्षी मनाला शांती मिळण्यासाठी तसेच वाईट विचारापासून संरक्षण होण्यासाठी नियमित मेडिटेशन करावे.मेडिटेशन जीवनपध्दती ही आपल्या भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली देणगी आहे.त्याचे महत्व आता सर्व जगाला पटले आहे.

त्यामुळे संयुक्त राष्ट्राने ही २१ डिसेंबर हा वर्ल्ड मेडिटेशन दिवस म्हणून घोषित केला आहे.मनुष्य शांत मनानेच योग्य तो निर्णय घेऊ शकतो.तसेच जीवनाला योग्य वळण लावू शकतो.असे मत डॉ. सुधा कांकरिया यांनी व्यक्त केले. येथील रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरच्या वतीने राजयोगा मेडिटेशनद्वारे मनशांती शिबीर संपन्न झाले.या शिबीरात राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया बोलत होत्या. यावेळी थंडीपासुन संरक्षणासाठी ब्लँकेट्सचे वाटपही करण्यात आले.

सदर प्रसंगी रोटरी पीस कमिटीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया, सचिव सुभाष गर्जे, अनाम प्रेमचे अध्यक्ष अजित माने, इंजिनियर रोनक माने, तुरूंग अधिकारी चंद्रकांत कदम, सुभेदार हरिषचंद्र उंबासे, हवालदार गणेश बेरड उपस्थित होते.

सुरूवातीस अधीक्षक संतोष कवार यांनी स्वागत करून मेडिटेशन मनाला समृध्द करण्यासाठी तर ब्लँकेट्स शरीराचे थंडीपासुन संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहेत.दोन्ही बाबींचा आज बंद्यांना लाभ होत आहे असे ते म्हणाले.रोटरीचे सचिव सुभाष गर्जे यांनी आभार मानले.

'मेडिटेशनद्वारे मनःशांती' चे उपक्रम अहिल्यानगर रोटरी पीस बिल्डर क्लबद्वारे अनेक विद्यालय, महाविद्यालय, स्वयंसेवी संस्था, अंध सेवा मंडळ, नामप्रेम, डॉक्टर्स संघटना, हृदयरोगाचे रूग्ण, तसेच कैदी बांधवांसाठी नियमित स्वरूपात घेण्यात येत आहेत. आज पर्यंत हजारो व्यक्तींनी याचा लाभ घेतला आहे असे ते म्हणाले



# नागरी गावालगतच्या पोथरा नदीवरील पुलाच्या उंचीवाढीसाठी नवीन पुलाच्या बांधकामाची मागणी

## सुरज प्रमोद धात्रक यांनी केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांना निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील नागरी गाव वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्याच्या अगदी सानिध्यात असल्यामुळे या परिसरातील शेतकरी बांधव बाजारपेठेसाठी, नागरिक दवाखान्यासाठी, तसेच विद्यार्थी शिक्षणासाठी हिंगणघाट येथे मोठ्या प्रमाणात दळणवळण करतात. हिंगणघाट बाजारपेठ केवळ १५ किलोमीटर अंतरावर असल्याने नागरिकांसाठी हा मार्ग सोयीचा आहे.

मात्र, या गावालगतच्या पोथरा नदीवरील पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्याच्या काळात नदीला पूर येतो आणि हा मार्ग अनेक दिवस बंद राहतो. यामुळे नागरिकांना तसेच प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

नदीवरील या पुलाची उंची वाढवून नवीन पूल बांधला गेल्यास नागरिकांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळेल, असे मत नागरिक व प्रवाशांनी व्यक्त केले आहे. या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष सुरज प्रमोद धात्रक यांनी १० जानेवारी २०२५ रोजी केंद्रीय इतर मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर



यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात त्यांनी नागरिकांच्या समस्येचा तपशील मांडत पुलाच्या उंची वाढवून नवीन पूल बांधण्याची मागणी केली आहे. यामुळे नागरिकांचे दळणवळण सुलभ होईल तसेच त्यांचा वेळ आणि खर्च वाचेल, असे धात्रक यांनी सांगितले.

नागरी व परिसरातील नागरिकांच्या समस्येची दखल घेऊन नवीन पुलाचे बांधकाम लवकर सुरू व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सलग दुसऱ्या दिवशी साक्री पोलिसांची मोठी कामगिरी, ३९ लाखांचा दारूसाठा जप्त



**धुळे । प्रतिनिधी**

साक्री पोलिसांनी सलग दुसऱ्या दिवशी मोठी कारवाई करत म्हसदी (ता. साक्री) येथील शेतातून ३९ लाख रुपयांचा बनावट दारूसाठा जप्त केला. काही दिवसांपूर्वी म्हसदी गावशिवारातून ६७ लाख रुपयांचा बनावट दारूसाठा जप्त करण्यात आला होता.

जयेश गुंजाळ याने त्याच्या शेतातील शेवगा पिकामध्ये दारूसाठा लपवून ठेवल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत रॉयल ब्यु माल्टा व्हिस्की आणि देशी सुगंधी संत्रा दारू यांचे एकूण ३९ लाख २७ हजार रुपयांचे ५०० हून अधिक खोके जप्त करण्यात आले.

जयेश गुंजाळ याने मानवी जीवनास हानिकारक आणि बेकायदेशीर दारूसाठा विक्रीसाठी लपवून ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, आणि उपविभागीय पोलिस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# १७ ला महिला अध्यापक विद्यालयात स्नेहसंमेलनाचे आयोजन

**भंडारा । प्रतिनिधी**

महिला शिक्षण प्रसारक मंडळ भंडारा द्वारा संचालित महिला ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे दिनांक १७ व १८ जानेवारी २०२५ ला दोन दिवसीय स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन स्त्रिरोग तज्ञ तथा भोंडेकर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अश्विनी नरेंद्र भोंडेकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी महिला शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक सुमंत देशपांडे राहतील. प्रमुख अतिथी म्हणून जि.शि. व प्र. संस्था, भंडाराच्या प्राचार्य रत्नप्रभा भालेराव, म.ज्यु.कॉ. ऑ. एज्यु. माजी प्राचार्या विजया पाटील, महिला शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश खोकले, उपाध्यक्ष बळवंत जोशी, सचिव संजय गुप्ते, कोषाध्यक्ष युगकांता रहांगडाले, संचालक पी.बी. फुंडे, किशोर वझलवार, रामदास शहारे, सुमंत देशपांडे, शुभांगीताई ऋषी, के. झेड. शेंडे, प्राचार्य वर्षा चांदेकर इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १७ जानेवारी २०२५ ला दुपारी २ वाजेपासून सुरू होणार आहे. बक्षिस वितरण शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ ला सकाळी ८ वाजता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता माध्य. तथा उच्च माध्य. विद्यालयाचे प्राचार्य धनराज बारस्कर राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून बेसिक उच्च प्राथ. शाळेच्या मुख्याध्यापिका अल्का पटोले, प्राचार्य वर्षा चांदेकर उपस्थित राहणार आहेत.

तरी स्नेहसंमेलनास उपस्थित राहून विद्यार्थिनींचा आनंद द्विगुणीत करावे असे आवाहन प्राचार्य वर्षा चांदेकर, प्रभारी शिक्षक गणेश किरसान, विनोद चव्हाण, महिला ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्यु., निलिमा काळे विद्यार्थिनी प्रतिनिधी, महिला ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्यु., भंडारा व समस्त शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# पोहण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्याचा कालव्यात बुडून मृत्यू ; राहुरी कृषी विद्यापीठ परिसरातील घटना

**राहुरी | प्रतिनिधी**

येथील कृषी विद्यापीठ परिसरातून जाणाऱ्या कालव्यात पोहण्यासाठी गेलेल्या पाच विद्यार्थ्यांपैकी संकेत तरटे हा दहावीचा विद्यार्थी बुधवारी सायंकाळच्या सुमारास कालव्याच्या पाण्यात बुडाला होता. गुरूवारी (दि.९) सकाळच्या दरम्यान त्याचा शोध घेण्यात यश आले आहे.तालुक्यातील डिग्रस येथे एका तरुणाला घटना स्थळापासून सुमारे दोनशे फूट अंतरावर कालव्याच्या पाण्यात मृतदेह तरंगताना सापडला आहे.

९) सकाळच्या दरम्यान त्याचा शोध घेण्यात यश आले आहे.तालुक्यातील डिग्रस येथे एका तरुणाला घटना स्थळापासून सुमारे दोनशे फूट अंतरावर कालव्याच्या पाण्यात मृतदेह तरंगताना सापडला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी तालुक्यातील विद्यापीठ येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय येथे संकेत तरटे, ओम जगदाळे, युवराज मोरे, तेजस कांदे तसेच आणखी एकजण, असे पाचजण १० वी च्या वर्गात शिक्षण घेत आहेत. बुधवारी (दि. ८) सदर पाच विद्यार्थी शाळा बुडवून विद्यापीठ परिसरात असलेल्या पाटात पोहायला गेले होते.

सायंकाळी चार वाजेच्या दरम्यान त्यापैकी संकेत श्रीपती तरटे (रा शहरी) व तेजस कांदे (रा. डिग्रस, ता. राहुरी) हे दोघेजण कपडे काढून पोहण्यासाठी कालव्याच्या पाण्यात उतरले होते.त्यांना पोहता येत नसल्याने दोघांपैकी संकेत तरटे हा विद्यार्थी पाण्यात बुडून वाहून जाऊ लागला.

तेव्हा त्याला वाचविण्यासाठी गेलेला तेजस कांदे हा देखील पाण्यात बुडू लागल्यामुळे एकच गोंधळ उडून त्याने आरडाओरडा केला. तेव्हा कालव्या जवळच राहणारे प्रशांत गावडे, भानुदास रोडे, अजय गावडे या तरुणांनी घटनास्थळाकडे धाव घेतली.

त्यांनी तात्काळ कालव्याच्या पाण्यामध्ये उडी मारून बुडत असलेल्या मुलांना वाचविण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी त्यांनी तेजस कांदे या मुलाला पाण्याच्या बाहेर काढून वाचविले.त्याला तातडीने अहिल्यानगर येथील रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.मात्र संकेत तरटे हा पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांनी घटनास्थळी धाव घेऊन सदर मुलाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.यावेळी पाटबंधारे अधिकारी सायली पाटील यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून मुळा उजवा कालवाचे पाणी तातडीने बंद करण्याचा आदेश दिला.मात्र बुधवारी उशीरा पर्यंत त्या मुलाचा शोध लागला नव्हता. अखेर काल गुरुवारी सकाळी ११.३० वाजेच्या दरम्यान, राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे एका तरुणाला घटना स्थळापासून सुमारे दोनशे फूट अंतरावर कालव्याच्या पाण्यात मृतदेह तरंगताना दिसून आला.

यावेळी परिसरातील राहुल गायकवाड, म्हाळु हळोनोर, अविनाश भिंगारदे, सोनू कोकाटे, अक्षय गोसावी या तरुणांनी कालव्याच्या पाण्यात उतरून मृतदेह पाण्यातून बाहेर काढला.यावेळी परिसरातील नागरीकांनी घटनास्थळी प्रचंड गर्दी केली होती.



# श्रीरामपूरात गृहमंत्री अमित शहा यांच्या निषेधार्थ मोर्चा

**श्रीरामपूर | प्रतिनिधी**

गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप केला जात आहे. यामुळे आंबेडकरवादी जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या असून, त्या विरोधात तसेच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्यावर झालेल्या अन्यायाचा निषेध करण्यासाठी आंबेडकरवादी नागरिकांनी शहरात विराट मोर्चा काढला.रिपब्लिकन पक्षाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात यांच्या नेतृत्वाखाली विविध दलित संघटना आणि अन्य पक्ष व संघटनांनी रेल्वे स्थानकाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून मोर्चा काढला.हा मोर्चा मुख्य रस्ता, शिवाजी रस्तामार्गे सय्यद बाबा चौकाजवळून भव्य विराट मोर्चा जात प्रांत कार्यालयावर पोहोचला.मोर्चाच्या



अग्रभागी संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्रे घेण्यात आली होती.नागरिकांच्या डोक्यावर निळ्या टोप्या होत्या आणि त्यांच्या हातात बाबासाहेबांचे छायाचित्र होते.मोर्चादरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यांच्या छायाचित्राला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा, अशी मागणी जोरात करण्यात आली.

शिर्डी येथे होणाऱ्या अमित शहा यांच्या दौऱ्याला विरोध करण्याचाही इशारा या वेळी देण्यात आला. प्रांत कार्यालयाजवळ पोहोचल्यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले.सभेत आमदार हेमंत ओगले, करण ससाणे, सचिन गुजर, संतोष भिंगारदिवे, दीपक कुऱ्हाडे, विलास त्रिभुवन, चरण त्रिभुवन, अनघा त्रिभुवन, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दीपक रजवल, संजय छल्लारे, उत्कर्षा रूपवते, पास्टर साळवे, जोएब इनामदार, आशिष शेळके, दीपक गायकवाड, शिवाजी गांगुर्डे,सूर्यभान भालेराव, श्रीकांत भालेराव, मोहन आव्हाड, रमा धीवर आदींनी सहभाग घेतला.या सभेत अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यात आला.सभेचे प्रास्ताविक सुनील शिरसाठ यांनी केले, तर संविधान वाचन पी. एस. निकम यांनी केले. सूत्रसंचालन सुभाष त्रिभुवन यांनी केले. तहसीलदार मिलिंद वाघ यांनी उपस्थित राहून निवेदन स्वीकारले.

# पाणलोट यात्रेचे प्रभावी नियोजन करा: जिल्हाधिकारी सालीमठ

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या १४० प्रकल्प क्षेत्रातील ३० जिल्ह्यांमधील गावांमध्ये पाणलोट यात्रेचे नियोजन करण्यात येणार असून या यात्रेचे योग्य नियोजन जलसंधारण विभागाने करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात पाणलोट यात्रेचे नियोजन करण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी पी. बी. गायसमुद्रे, जिल्ह्यातील एकूण सात प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी, व कृषी, वन, विभाग, सामाजिक वनीकरण, शिक्षण ई विभागचे जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय भू संसाधन विभाग ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांचे मार्फत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक




२.० ही योजना राज्यात राबविण्यास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन घटकांतर्गत पाणलोट विकासाची कामे करण्यात येतात तसेच उपजीविका उपक्रम उत्पादन पद्धती अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

# सरपंच हत्याप्रकरणी ग्रामपंचायतींचे कामकाज ठप्प;जिल्ह्यात आंदोलनाला व्यापक प्रतिसाद

**श्रीरामपूर | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करीत सरपंच सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच सेवा महासंघाच्या महिला जिल्हाध्यक्ष व तालुक्यातील भैरवनाथनगर ग्राम पंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच दिपाली फरगडे यांच्या पुढाकाराने ग्रामपंचायतींचे कामकाज बंद आंदोलन सुरू आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.या आंदोलनामुळे अनेक ग्रामपंचायतींचे कामकाज ठप्प झाले आहे.अहिल्यानगर सरपंच सेवा संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष दिपाली प्रविण फरगडे यांनी स्पष्टपणे सांगितले की, जर या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई झाली नाही, तर हे आंदोलन थांबणार नाही आणि ते मुंबईपर्यंत नेले जाईल.

त्यांनी प्रशासनाला ठाम शब्दात सांगितले की,सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी न्याय मिळाला नाही,तर या आंदोलनाचा अधिक व्यापक विस्तार केला जाईल.या आंदोलना- दरम्यान भैरवनाथनगर ग्रामपंचायतच्या उपसरपंच चंद्रभागाबाई काळे, प्रविण फरगडे, बाळासाहेब गायकवाड,




नवनाथ अकोलकर, प्रमोद फरगडे, चंदर शिंदे, भाऊसाहेब राऊत, चंद्रभान फरगडे, श्रीराम फरगडे, रावसाहेब शेळके, पंढरीनाथ फरगडे, सुनिल नेरकर, अंगणवाडी सेविका प्रमिला सुलाखे, योगिता गोरे, अनिता गायधने, ज्योती लबडे, पल्लवी फरगडे, जयश्री पाटील, अनिता होले, प्रफुल्ल पटारे, तृप्ती जगदाळे, यासीन शेख, सागर लबडे

तसेच भैरवनाथनगर ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच यासाठी जिल्ह्यातील सर्व सरपंच यांनी पाठींबा दर्शविलेला आहे.यासाठी तालुक्यातील मालुंजाचे सरपंच अच्युतराव बडाख, वळदगाव सरपंच पुष्पा भोसले उंबरगाव सरपंच सुप्रिया भोसले, कडीत सरपंच सविता वडीतके, सराला सरपंच जयश्री औताडे, टाकळीभान सरपंच अर्चना रणनवरे, निमगाव खैरी सरपंच दत्तात्रय झुराळे, शिरसगावच्या सरपंच राणी वाघमारे

उक्कलगाव सरपंच रविना शिंदे, गुजरवाडी सरपंच अलका गुजर, दिघी सरपंच अनिता जाधव, भोकर सरपंच शीतल पटारे, रांजणखोल सरपंच सागर ढोकचौळे, नायगाव सरपंच डॉ. राशिनकर, खोकरच्या सरपंच आशाबाई चक्रनारायण, खंडाळाच्या सरपंच छाया बर्डे यासह आदी गावातील सरपंचांनी ग्रामपंचायत कामकाज बंद ठेवण्यास पाठींबा दिलेला आहे

# श्री क्षेत्र कोल्हार च्या कृषक शेतकरी गटाला महाग्रो आयडॉल पुरस्कार प्रदान

**कोल्हार | प्रतिनिधी**

शेती सोबत शेतकऱ्यांना कृषी व्यवसायातून आर्थिक उन्नती साधावी तसेच उद्योजकता निर्मितीतुन रोजगार निर्मिती शक्य व्हावी आपले वैयक्तिक जीवन जगत असताना आपण इतरांना देखील प्रोत्साहित तसेच आपल्या सोबत अनेक लोकांना मोठे करणे गरजेचे आहे हा उद्देश समोर ठेवून कृषक शेतकरी गट कार्य करत आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत सन २०१०-११ला कृषक शेतकरी गटाची स्थापना केली. टप्प्याटप्प्याने शेतकरी एकत्र येत विविध शेतातील प्रयोग, सरकारी योजना, नवीन पीक बदल,दुग्ध व्यवसाय, विक्री व्यवस्थापन, खत औषध खरेदी,विविध मेळावे यापासून सुरुवात केली.

अनुभवी शेतकरी तसेच तज्ञांचे मार्गदर्शन घेत पीक व्यवस्थापनात बदल करण्यासाठी कृषी शेतकरी गटांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी शेतकरी जसे संजीव माने कृषी विज्ञान केंद्र,कृषी विद्यापीठ येथील शास्त्रज्ञ तसेच कृषी विभाग यांच्या सल्ल्यानुसार आणि सेंद्रिय खतांचा वापर कसा करावा याविषयी मार्गदर्शन घेत गटाचे काम सुरू केले,यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाया



जात नाही. गटातील शेतकऱ्यांचे आज पर्यंत मिळालेले पुरस्कार - आदर्श शेतकरी पुरस्कार,आदर्श दुग्ध उत्पादक,प्रगतशील शेतकरी पुरस्कार,उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार, उत्कृष्ट ऊस उत्पादक शेतकरी असे अनेक कृषी विभाग तसेच इतर समाज माध्यमांचे पुरस्कार गटातील शेतकऱ्यांना मिळाले आहे. या सर्व कार्याची दखल घेत ऍग्रो केअर कृषी मंच संस्थेचा १६ वा राष्ट्रीय महाग्रो आयडॉल पुरस्कार कृषक शेतकरी गटाला राष्ट्रीय पुरस्कार डीपीडीसी हॉल सेंट्रल बिल्डिंग धाराशिव येथे देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्रमणी,जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव,महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा चे प्रकल्प संचालक खंडेराव सराफ,कृषी विज्ञान केंद्र तुळजापूरचे प्रमुख डॉक्टर सचिन सूर्यवंशी,ऍग्रो केअर ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. यावेळी कृषी शेतकरी गटाचे अध्यक्ष सचिव सहसचिव सदस्य उपस्थित होते.

# कर्जत तालुक्यातील मंडळ अधिकाऱ्याला १ लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडले, गुन्हा दाखल

**कर्जत | प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कडाव येथील मंडळ अधिकारी चंद्रकांत ठकाजी केंडे याला १ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे. रायगडलाचलुचपत(ईीळलशी) प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. ८ जानेवारी २०२५ रोजी या घटनेची उकल झाली, जेव्हा केंडे याने तक्रारदाराकडून खरेदी केलेल्या जमिनीच्या फेरफार नोंदीसाठी लाच मागितली होती.

घटना ३१ डिसेंबर २०२४ रोजी घडली. दहिगाव तालुक्यातील एका व्यक्तीने कडाव येथील मंडळ अधिकारी चंद्रकांत केंडे याच्याकडे आपलीजमिनीच्याफेरफार नोंदीसाठी अर्ज केला होता. या अर्जाच्या प्रक्रियेसाठी केंडे याने तक्रारदाराकडून १ लाख रुपयांची मागणी केली होती

घटना ३१ डिसेंबर २०२४ रोजी घडली. दहिगाव तालुक्यातील एका व्यक्तीने कडाव येथील मंडळ अधिकारी चंद्रकांत केंडे



याच्याकडे आपलीजमिनीच्याफेरफार नोंदीसाठी अर्ज केला होता. या अर्जाच्या प्रक्रियेसाठी केंडे याने तक्रारदाराकडून १ लाख रुपयांची मागणी केली होती.

तक्रारदाराने या मागणीबद्दल रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली, आणि त्यानंतर विभागाने ७ जानेवारी २०२५ रोजी तपास सुरू केला. तपासाच्या नंतर ८ जानेवारी २०२५ रोजी पोलीस उपअधीक्षक शशीकांत पाडावे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने एक सापळा रचला. त्यामध्ये केंडे याने तक्रारदाराकडून १ लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडला गेला.

लाच घेणारा अधिकारी चंद्रकांत ठकाजी केंडे याला ताब्यात घेतले असून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंडे हा रोहा तालुक्यातील नागोठणे येथील रहिवासी असून, त्याला लाच घेतानाचे धक्कादायक उदाहरण समोर आले आहे.

या कारवाईत रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक संजय गोवीलकर आणि अपर पोलीस अधीक्षक सुहास यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वी झाली.

कर्जतच्या कडाव येथील हा प्रकार आणि लाचलुचपत विभागाने घेतलेली कडक कारवाई या मुद्द्यावरून सरकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक कठोर संदेश जातो आहे. सरकारने लाचखोरी विरोधी मोहीम तेज केली आहे आणि अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई सुरू केली आहे.

# कर्जत तालुक्यात धक्कादायक घटना!;अज्ञात व्यक्तीचा खून करून मृतदेह जमिनीत पुरला अन

**कर्जत | प्रतिनिधी**

अज्ञात व्यक्तीचा खून करून मृतदेह कर्जत तालुक्यातील रवळ गावात पुरल्याची धक्कादायकघटनाउघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात खळबळ माजवली असून, पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणी तात्काळ तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रवळ गावाच्या कोंभळी रस्त्यावर गट क्रमांक २२४ च्या गोरख पंढरीनाथ खेडकर यांच्या माळरान जमिनीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह हजर होता. सकाळी फिरायला आलेल्या काही तरुणांनी या मृतदेहाची नोंद घेतली आणि गावाच्या पोलीस पाटलांना सूचित केले. माहिती मिळाल्यावर पोलीस पाटील सुनील रामचंद्र खेडकर यांनी मिरजगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील यांना कळवले आणि पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले.पोलीस पथकाने घटनास्थळी तपासणी सुरू केली. घटनास्थळावरून काही श्वान पथकाला देखील बोलावले गेले, परंतु यावेळी त्यांचा मागोवा घेण्यात काहीही निष्कर्ष निघाला नाही. तसेच, फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी रक्ताचे आणि गुन्ह्यात वापरलेल्या दगडावर ठसे घेतले. हे नमुने पुढील तपासणीसाठी नाशिकला पाठवले जाणार आहेत.

घटनास्थळी पोहोचलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी शवविच्छेदनासाठी अज्ञात मृतदेह मिरजगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवला. यावेळी शासकीय साक्षीदार म्हणून सुभाष हारी खेडकर आणि अनिल लहू मथे ग्रामसेवक उपस्थित होते.या प्रकरणी तपास सुरू असताना, स्थानिक पोलीस विभाग आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी तपास करत आहेत. याबाबत कर्जत पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस अधीक्षक वाखारे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश भताने मार्गदर्शन करत आहेत. पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत असून, अज्ञात हल्लेखोराचा शोध घेण्यासाठी विविध पद्धतींचा वापर करण्यात येत आहे

# जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आदेश; जिल्ह्यात 'मिशन १०० दिवस' ७ कलमी कार्यक्रमास सुरुवात

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना असलेल्या ७ कलमी कार्यक्रमांची 'मिशन १०० दिवस' अंतर्गत अंमल बजावणीसाठी पूर्व तयारीचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.त्यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उप वनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उप जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उप जिल्हाधिकारी अतुल चोरमारे आदी उपस्थित होते.



सर्व विभाग प्रमुखांनी सात मुद्यांवर काम करण्याबाबतच्या सूचना देताना जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले,प्रत्येक विभागाने आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करावी, जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळ अधिक माहितीपूर्ण आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्यावर भर द्यावा.

नागरिकांना ऑनलाइन सुविधांचा जलद लाभ घेता यावा यासाठी संकेतस्थळ नसलेल्या विभागांनी अद्ययावत संकेतस्थळांची निर्मिती करावी.नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करण्यावर भर द्यावा, यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतींचा वापर करावा.

नागरिकांच्या तक्रारी व अर्जावर सात दिवसांच्या आत निराकरण करण्यात यावे,अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.कार्यालयात नागरी सुविधा पुरविण्यात याव्यात, यामध्ये शासकीय कार्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, कार्यालयातील स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवणे, अभ्यागत कक्ष निर्माण करावा, कार्यालयाची रंगरंगोटी व सुशोभीकरण यावर भर देण्यात यावा.

अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या विविध भागांना भेट देऊन प्रत्यक्ष अंमल बजावणीवर लक्ष ठेवावे, दोन दिवस क्षेत्रीय भेटीसाठी राखून ठेवावा, तसेच क्षेत्रीय भेटीमध्ये शासनाच्या महत्त्वकांक्षी व पथदर्शी योजनांचा आढावा घेण्यात यावा, अशा सूचना ही त्यांनी दिल्या.सात कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा दर मंगळवारी ऑनलाईन आढावा घेतला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ई-ऑफिस प्रणालीत जिल्हा प्रथम : सालीमठ

जिल्ह्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तातडीने सर्व परवाने संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येतील. उद्योजकांची कुठेही अडवणूक होणार नाही, यासाठी दक्ष रहा.

अहिल्यानगर जिल्हा ई-ऑफिस प्रणाली राबविण्यात राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.यापुढे आपला जिल्हा सर्व विभागात ई ऑफिसची अंमलबजावणी करणारा प्रथम जिल्हा ठरला पाहिजे, यासाठी सर्व विभागांनी काम करावे.

लोकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक राहून मिशन १०० दिवस उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या.या उपक्रमांतर्गत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा आणि उद्योजकांना गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# फिरोदिया हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली शपथ;नायलॉन मांजाची केली होळी

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

महानगरपालिका व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे नायलॉन मांजाची होळी करण्यात आली.विद्यार्थ्यांमध्ये नायलॉन मांजाच्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम, मानवी जीवन व पक्ष्यांना होणारी इजा याबाबत जनजागृती करण्यात आली.



नायलॉन मांजाचा वापर न करण्याबाबत सामुहिक शपथ घेण्यात आली.माझी वसुंधरा अभियानात सहभागी होण्याची सामूहिक शपथही घेण्यात आली.मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाचा वापर पतंगप्रेमी करत आहेत.या मांजाच्या विक्री व वापरावर राष्ट्रीय हरीत लवादाने बंदी घातली आहे.

याबाबत कारवाईची तरतूदही करण्यात आली आहे.आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार महापालिकेने विविध पथके स्थापन करून तपासणी सुरू केली आहे.मात्र,नायलॉन मांजाचा वापर टाळण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे.त्यामुळे महानगरपालिका, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून नायलॉन मांजाची होळी करण्यात आली.

दरम्यान, आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या दर शनिवारी स्वच्छता अभियानात रासने नगर चौक ते डौले हॉस्पिटल बिल्डींग ते म्हाडा बिल्डींग परिसरात स्वच्छता मोहीम पार पडली. यामध्ये जेसीबी, ट्रॅक्टर, जेटींग मशीनच्या साह्याने स्वच्छता करण्यात आली.या स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला.

# अहिल्यानगरमध्ये रब्बी पेरणी सरासरीपेक्षा कमी

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

जिल्ह्यात आतापर्यंत रब्बी पेरणी क्षेत्र सरासरीच्या आतच आहे. आतापर्यंत रब्बीची ५ लाख ३ हजार ९६१ हेक्टरवर पेरणी झाली आहे. गेल्या वर्षापेक्षा यंदा ३२ हजार हेक्टरने रब्बीचे क्षेत्र वाढले आहे.



गहू, मका, हरभऱ्याची पेरणी अधिक असून ज्वारीने मात्र यंदाही सरासरी गाठली नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यात रब्बीचे ४ लाख ५८ हजार १४९ हेक्टर सरासरी क्षेत्र आहे. यंदा पावसाची व पाण्याची स्थिती चांगली असल्याने रब्बी पेरण्याला वेग येईल असे वाटत होते. मात्र परतीचा पाऊस गेल्यानंतरही मध्यंतरी अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे पेरण्या रखडल्या होत्या. आतापर्यंत सर्वाधिक ज्वारीची पेरणी झाली आहे.

गेल्या दहा वर्षांचा विचार करता पन्नास टक्के ज्वारीचे क्षेत्र कमी झाले आहे. यंदा अजून ज्वारीचे क्षेत्र सरासरीच्या पेरणीपेक्षा कमी होते की काय अशी स्थिती आहे. हरभरा, मका, गव्हाच्या पेरण्या जोरात झाल्या आहेत.

आता या पेरण्याचाही कालावधी संपल्यासारखा आहे. मध्यंतरी कमी झालेली थंडी पुन्हा चार-पाच दिवसांपासून वाढली आहे. आतापर्यंत ज्वारीची सरासरीच्या ५२ टक्के, गव्हाची १६५ टक्के पेरणी झाली आहे. मक्याच्या पेरणी अधिक झाली आहे. मक्याची आतापर्यंत २६७ टक्के पेरणी झाली आहे. हरभऱ्याची ११८ टक्के झाली आहे. करडई, जवस, तीळ, सूर्यफुलाचे पेरणी क्षेत्र अल्प आहे. रब्बीत होणारी ऊस लागवड यंदा आतापर्यंत ७१ टक्के म्हणजे ६७ हजार २५६ हेक्टरवर झाली आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा रब्बीची स्थिती चांगली आहे. मात्र आता बऱ्याच पिकांचा पेरणी कालावधी संपलेला असल्याने आता फारशी पेरणी क्षेत्र वाढेल अशी असे दिसत नाही. त्यामुळे यंदाही सरासरी एवढी पेरणी होईल की नाही यात शंका आहे. यंदा कांदा लागवडीला मात्र अधिक शेतकऱ्यांनी प्राधान्य दिलेले आहे.

# विधानसभेला ते तिन्ही पक्ष स्वतंत्र लढू किंवा एकमेकांच्या डोक्यावर राहून लढू,चिंता नाही'-राधाकृष्ण विखे पाटील

**लोणी | प्रतिनिधी**

विधानसभेला या तिन्ही पक्षाला जनतेने नाकारलं आहे. ते आता निवडणुका स्वतंत्र लढू किंवा एकमेकांच्या डोक्यावर राहून लढू,त्याची आम्हाला चिंता नसल्याचे वक्तव्य राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं. राज्यामध्ये जो विजय आम्हाला विधानसभेला मिळाला तोच विजय आम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मिळेल,असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला. आगामी महापालिका निवडणुका शिवसेना ठाकरे गट स्वबळावर लढवणार असल्याचं खासदार संजय राऊत यांनी सांगितलं आहे. यावर विखे पाटील यांनी ही प्रतिक्रिया दिली. ते शिर्डीत बोलत होते.शिर्डीत भाजपचे राज्यस्तरीय अधिवेशन होणार आहे.अधिवेशन स्थळाचा आज राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आढावा घेतला.त्यावेळी ते बोलत होते.आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सुद्धा भाजपला महाविजय मिळवायचा आहे. या निवडणुकांच्या दृष्टीने रणशिंग फुंकल जाणार असल्याचे विखेंनी सांगितले.यावेळी विखे पाटील म्हणाले की, मी मागेच म्हणालो होतो, महाविकास आघाडीची बिघाडी व्हायला वेळ लागणार नाही.महाविकास आघाडीचे लोक भूमिका आणि तत्व यासाठी एकत्र आलेले नाहीत.



महाविकास आघाडीची सत्तेत येण्याची धडपड होती,असा टोला विखे पाटलांनी लगावला. कोणी हिंदुत्व सोडलं, कोणी आपल्या विचारधारेला बाजूला ठेवले. सत्ता गेल्याबरोबर महाविकास आघाडीतील मतभेद समोर यायला सुरुवात झाली.काँग्रेस उबाठाबद्दल बोलतंय, उबाठा राष्ट्रवादी बद्दल चर्चा करतय, असे म्हणत विखे पाटलांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून तिन्ही पक्षांनी सत्तेच्या लालसेपायी सत्ता स्थापन केली होती. निगेटिव्ह नॅरेटिव्ह सेट करून त्यांनी विजय संपादन केला होता. मात्र, ते नॅरेटिव्ह विधानसभेला चाललं नाही असंही विखे पाटील म्हणाले. मुख्यमंत्री पदाची स्वप्न पाहणारे घरी बसलेत, काँग्रेस पक्षाची दुरावस्था मी सांगण्याचं कारण नाही असेही विखे म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत महाविकास आघाडी राहील अशी स्थिती नाही, असंही ते म्हणाले.

# महाराष्ट्र राज्य शिक्षकेत्तर महामंडळाचे चंद्रपूर येथे अधिवेशन

संघ शक्ती कलीयुगे
सेवा त्याग निष्ठा

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे १९ जानेवारी रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य शिक्षकेत्तर महामंडळाचे ५२ व्या अधिवेशनास जिल्ह्यातील सर्वच शिक्षकेत्तर बंधू भगिनींनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रसिद्धी प्रमुख आमोद नलगे यांनी केले.

यावेळी विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे, जिल्हा अध्यक्ष भीमाशंकर तोरमल, जिल्हा सचिव भानुदास दळवी उपस्थित होते.नलगे यांनी हे अधिवेशन एक ऐतिहासिक अधिवेशन ठरणार असून या अधिवेशनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.अधिवेनात अनेक प्रलंबित प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले जाणार आहे.शिक्षकेत्तरांना पदोन्नतीची संधी देणे, अनुकंपा तत्वावर भरती, शिक्षकेत्तरांची नवीन भरती सुरू करणे, आश्वसित प्रगती योजना १०-२०-३० लागू करणे, यासारख्या अनेक प्रलंबित प्रश्नावर चर्चा होऊन सरकारकडे एकमुखाने मागणी करणार आहेत. अधिवेशनास जिल्ह्यातून सर्व शिक्षकेत्तर बंधू -भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सहकार महर्षि भाऊसाहेब थोरात जयंती निमित्त संगमनेरमध्ये मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर

**संगमनेर | प्रतिनिधी**

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंती महोत्सवानिमित्त संगमनेर मध्ये स्वर्गीय डॉ. शरद कुमार दीक्षित अमेरिका यांच्या स्मरणार्थ लायन्स क्लब ऑफ संगमनेर यांच्या वतीने ११, १२ व १३ जानेवारी रोजी मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख डॉ.सुचित गांधी व डॉ.प्रवीण पानसरे,लायन्स क्लबच्या अध्यक्षा राखी करवा यांनी दिली आहे.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकारातून संगमनेर तालुक्यात समृद्धी निर्माण केली आर्थिक शिस्त विकासाची परंपरा घेऊन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्याला वैभवशाली बनवले आहे.सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी संगमनेरमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन होते.यावर्षी ही जयंती व डॉ.शरद कुमार दीक्षित यांच्या स्मरणार्थ लायन्स क्लब ऑफ संगमनेर व सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात जयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत प्लास्टिक सर्जरी ११, १२ व १३ जानेवारी रोजी डॉ प्रवीण पानसरे यांचे धन्वंतरी हॉस्पिटल येथे होणार आहे.या मोफत प्लास्टिक शिबिर सर्जरी मध्ये दुबगलेले ओठ व टाळू ,नाक व कान यावरील बाह्य विकृती,तसेच जन्मता फाटलेले ओठ व टाळूंच्या शस्त्रक्रिया,छोटे कान,तिरपे नाक,तिरपी हानवुटी इत्यादीसाठी मोफत तपासणी व शस्त्रक्रिया होणार आहे.या शस्त्रक्रियांसाठी डॉ.शरद कुमार दीक्षित यांच्या समवेत काम केलेले अमेरिके तील त्यांचे सहकारी डॉ लेरी व्हेन स्टेन,डॉ.बैरी सिट्रोन,डॉ.लेडीज ब्रेन,डॉ लिंडा पीटरसन व त्यांचे सहकारी येणार आहे.अमेरिकेहून संगमनेर मध्ये येऊन अनेक डॉक्टर रुग्णांची मोफत सेवा करणार असून या मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिरा चा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा,असे आवाहन लायन्स क्लबचे अध्यक्ष राखी करवा,सचिव डॉ.अबोली गांधी,खजिनदार श्वेता जाजू,श्रीनिवास पगडाल,डॉ.सुचित गांधी,डॉ प्रवीण कुमार पानसरे,डॉ.जयश्री थोरात सह विविध मान्यवरांनी केले आहे

# कोपरगाव येथे गोदाकाठ महोत्सव २०२५ 'चे उदघाटन पुष्पाताई काळे यांच्या शुभहस्ते संपन्न

**कोपरगाव | प्रतिनिधी**

प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या वतीने महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्ट कोपरगाव येथे आयोजित 'गोदाकाठ महोत्सव २०२५ 'चे उदघाटन मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी आशुतोष काळे हे उपस्थित होत्ते.



महोत्सवाच्या पहिल्या दिवशी कोपरगाव मतदारसंघातील जिल्हा परिषद - पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, आशा सेविका, लाडकी बहीण योजनेसाठी मदत करण्याऱ्या स्वयंसेविका यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी तहसीलदार महेशजी सावंत, नायब तहसीलदार प्रफुल्लिताताई सातपुते, कृषी अधिकारी मनोजजी सोनवणे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमशेठ बागरेचा, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष शंकरराव चव्हाण, गौतम सहकारी बँकेचे चेअरमन संजयजी आगवन, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथजी जामदार, पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन देवेनजी रोहमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धनजी परजणे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे व्हा. चेअरमन, संचालक, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व नागरिक आदी उपस्थित होते.

# पंतग उडवणे बेतले जीवावर; १२ वर्षीय मुलीचा विहीरीत पडून मृत्यू

**राहुरी | प्रतिनिधी**

मकरसंक्रात अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे, त्यामुळे पंतग उडवण्याचा आनंद अनेक मुलं-मुली घेतांना दिसून येत आहे. मात्र पंतग उडवणे जीवावर बेतल्याची घटना राहुरी तालुक्यात घडली असून, यात या मुलीचा मृत्यू झाला आहे.

मानोरी ग्रामपंचायत हद्दीत एक १२ वर्षीय परप्रांतीय मुलगी पतंग उडवताना विहीरीत पडली. आणि तीचा पाण्यात बुडून दुदैवी अंत झाल्याची घटना शुक्रवारी १० जानेवारी रोजी सकाळी घडली.



नेपाळ येथील एक कुटुंब राहुरी तालुक्यातील मानोरी ग्रामपंचायत हद्दीत खिळे वस्ती रोड परिसरात राहत आहे. मयत मुलीचे वडील एका हॉटेलमध्ये आचारी म्हणून काम करतात. त्यांना दोन मुले व दोन मुली आहेत. त्यापैकी बिनीता बिष्णू थापा ही १२ वर्षाची मोठी मुलगी असून ती पाचवी च्या वर्गात शिक्षण घेत होती. सुमारे पाच महिन्यापूर्वी ती नेपाळ येथून आली होती. मुलीने हट्ट केल्यामुळे तीचे वडील बिष्णू थापा यांनी तीला पंतग आणून दिली. शुक्रवारी सकाळी ८.३० वाजे दरम्यान ती मुलगी इतर मुलांबरोबर आपल्या घराजवळ पतंग उडवीत होती. पतंग उडवीत असताना ती मुलगी तेथे असलेल्या एका विहीरीत पडली. आणि पाण्यात बुडू लागली. तेव्हा इतर मुलांनी आरडाओरडा केला. त्यावेळी परिसरातील सर्जेराव जाधव, तुषार बाचकर यांनी ताबडतोब धाव घेऊन विहीरीत उड्या मारल्या आणि पाण्यात बुडालेल्या मुलीचा शोध घेतला. त्यानंतर मुलीला दोरीने बांधून विहीरीतून बाहेर काढण्यात आले. सचिन धसाळ व सचिन गुंजाळ या रुग्णवाहिका चालकांनी तिला तातडीने राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र वैद्यकिय अधिकार्यांनी तीला तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. यावेळी मयत बिनीता या मुलीच्या नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात मोठी गर्दी केली होती. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

## युवाशक्तीचा बुलंद आवाज

# अजिंक्यराणा पाटील यांचा समाजसेवेचा यशस्वी प्रवास

**मोहोळ तालुक्याच्या हरितक्रांतीचे प्रणेते, माजी आमदार राजन पाटील यांचे सुपुत्र आणि लोकनेते बाबुराव (अण्णा) पाटील यांच्या कुटुंबीयांचा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या अजिंक्यराणा उर्फ रावसाहेब पाटील यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्याने सोलापूर जिल्ह्यातील तरुणांच्या हृदयावर अधिराज्य निर्माण केले आहे. थोरले बंधू बाळराजे पाटील यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाखाली अजिंक्यराणा यांनी समाजकारणाच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.**



**बापूसाहेब ज्ञानबा घळके,**
**दैनिक सह्याद्रीचा राखणदार मोहोळ तालुका प्रतिनिधी**

लोकनेते बाबुराव पाटील यांनी उभारलेला लोकसेवेचा वटवृक्ष अजिंक्यराणा यांनी जपला असून, सामान्य माणसांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा त्यांचा मनोभाव आजही जिवंत आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी आपले जीवन समर्पित करण्याची त्यांची तळमळ आणि आत्मविश्वास त्यांना 'प्रति अण्णा' या विशेषणाने ओळख मिळवून देतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मृदूता, चेहऱ्यावरील निरागसता, आणि सामाजिक बांधिलकी हीच त्यांची खरी ताकद आहे.

अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली हजारो तरुण कार्यकर्ते उभे आहेत. त्यांच्या विचारांना गती मिळावी आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात, यासाठी अजिंक्यराणा अविरत प्रयत्नशील आहेत. तरुणांच्या विश्वासाला आपण सार्थ ठरविण्यासाठी ते विविध उपक्रमांद्वारे त्यांच्यासोबत काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात असून, त्यातून सामान्य जनतेला दिलासा मिळतो आहे.

मोहोळ तालुक्यातील राजकीय वर्तुळात अजिंक्यराणा पाटील यांनी लहान वयातच आपला ठसा उमटवला. थोरले बंधू बाळराजे पाटील यांचे मार्गदर्शन आणि वडील राजन पाटील यांचे आशीर्वाद हे त्यांच्या यशाचे मूळ आहेत. जिज्ञासू वृत्ती, परिपक्वता, आणि लोकांशी संवाद साधण्याचे नैसर्गिक कौशल्य यामुळे त्यांचे नेतृत्व आज लोकांना प्रेरणा देत आहे.

अजिंक्यराणा यांचा वाढदिवस हा मोहोळ तालुक्यातील जनतेसाठी मोठा उत्सव असतो. २० जानेवारीला असलेला त्यांचा वाढदिवस एक दिवसाचा कार्यक्रम न राहता, संपूर्ण महिनाभर 'अजिंक्यराणा उत्सव' म्हणून साजरा केला जातो. प्रत्येक गावातील लोक त्यांच्या कुटुंबीयाप्रमाणे प्रेम व्यक्त करतात. हीच त्यांची खरी संपत्ती आहे.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अजिंक्यराणा पाटील यांची वाटचाल निश्चितच प्रेरणादायी आहे. तरुणांना सक्षम करण्यासाठी आणि समाजात परिवर्तन घडवण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ तालुका आणि सोलापूर जिल्हा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

राजकीय क्षेत्रात बेधडकपणा, पारदर्शकता, आणि समाजासाठी समर्पण यांचा वारसा जपणाऱ्या अजिंक्यराणा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या कार्याला सलाम. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

शुभेच्छुक–स्वानंद सुनील घाटुळे



वडील माजी आमदार राजन पाटील यांच्या कडून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील बाळकडू



• पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समवेत



• उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समवेत



• निर्व्याज मैत्री जपणारे अजिंक्यराणा पाटील

## म्हसणे फाटा टोलनाक्यावर २० जानेवारीला नारायण गव्हाणकरांचे चौपदरी करणासाठी टोल बंदपत्रक वितरण आंदोलन



### नगर पुणे महामार्ग अपघात मुक्त करा– पवळे

**नारायणगव्हाण चौपदरिकरणाचे काम तातडीने सुरू करा,वेळकाढूपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा, तसेच भूधारकांना योग्य मोबदला दया,अन्यथा ग्राम सुरक्षेसाठी नारायणगव्हाणकर म्हसणे फाटा टोलनाका बंद केल्याशिवाय मागे हटणार नाही याची प्रशासणाने नोंद घ्यावी–शरद पवळे सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे.**

**पारनेर । प्रतिनिधी**

महामार्गावर शालेय विद्यार्थी,गावकरी यांसह प्रवाशी धोक्यात असताना आम्ही गप्प कसे बसुसामाजिक कार्यकर्ते सचिन शेळके सार्वजनिक बांधकाम विभागाने भूमी अभिलेख कार्यालयाकडे नारायणगव्हाणच्या चौपदरीकरणासाठी मोजणीचे शुल्क तातडीने जमा करूनही भूमी अभिलेख कार्यालयाकडून कुठल्याही प्रकारची हालचाल होताना दिसत नाही नारायणगव्हाणकरांसह प्रवाशांचा महामार्गावर प्रवास अत्यंत जीवघेणा बनला असून वेळोवेळी प्रत्येक प्रशासकीय विभागाला पाठपुरावा करत गावच्या संवेदनशीलतेची प्रशासनाला जाणीव करून दिली असून प्रशासनाकडून दिरंगाई होत असून नारायणगव्हाणकरांनी सुरुवातीपासून प्रशासनाला सहकार्याची भूमिका ठेवली असून प्रशासकीय अधिकारी जबाबदारीने काम करताना दिसत नसून प्रशासनाकडून होणारा जीवघेणा निष्काळजीपणा घातक असून प्रशासणाला जाग करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे , सचिन शेळके यांनी निवेदन देत रास्ता रोको,धरणे आंदोलन उपोषण यांसह पारनेर तहसिल कार्यालयावर लोटांगन आंदोलन केले परंतु या आंदोलनाकडे तहसिलदारांनी,प्रशासणाने जाणीपूर्वक पाठ फिरवली दिवसेंदिवस महामार्गावर गाड्यांची वाढती संख्या व अरुंद रस्ता यामुळे दळणवळचा वाढता धोका जीवघेणा निर्माण झाल्यामुळे नाईलाजास्तव पुन्हा नव्याने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले यावेळी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांच्यासमोर परिस्थितिचे गांभिर्य समोर ठेवत विद्यार्थी,ज्येष्ठ नागरिक यांसह प्रवाशांची महामार्गावरील होणारी जीवघेणी कसरत थांबवण्यासाठी नारायणगव्हाण चौपदरीकरणाचे काम सुरू करा अन्यथा २० जानेवारीला म्हसणे फाट्यावर नारायणगव्हाण ग्रामसुरक्षेसाठीटोल बंदपत्रक वितरण आंदोलन करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन शेळके यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

## अहमदनगर नगर महा विद्यालयात नेक्सजेन प्रदर्शन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहमदनगर विद्यालय बी.बी.ए. विभागाच्या विद्यार्थ्यांतर्फे नेक्सजेन २०२५ प्रदर्शनाचे आयोजन दि. १६ जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात नगरकरांना खरेदी व विक्रीचा अनुभव घेता येणार आहे.

हे प्रदर्शन अहमदनगर महाविद्यालय येथील प्लेग्राउंडवर होणार असून या प्रदर्शनात विविध प्रकारचे ५५ स्टॉल आहेत. त्यामध्ये कपडे, मोबाईल, क्सेसरीज, ज्वेलरी, विविध एज्युकेशन इन्स्टिट्यूट, ऑटोमोबाईल आणि फूड स्टॉल आहेत.




या प्रदर्शनात सर्व नगरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्याहस्ते करण्यात येणार आहे

# साखरे वस्ती शाळेत चिमुकल्यांचा आनंद मेळावा आणि आठवडे बाजार उत्साहात

## भविष्यात साखरे वस्ती शाळा आदर्श शाळा बनेल–अनिता खरात

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

खोरोची जिल्हा परिषद साखरे वस्ती शाळेत विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा आणि आठवडे बाजार मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, पैशाची देवाणघेवाण, सुट्ट्या नोटांचा उपयोग, तसेच ज्येष्ठांशी आदराने वागण्याचे धडे मिळाले. शाळेतील मुलांना व्यवसायिक दृष्टिकोनातून ज्ञान मिळावे, यासाठी आठवडे बाजार उपक्रमाने विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक स्वरूपात अनुभव दिला.

शाळेच्या आठवडे बाजारामुळे परिसरातील महिलांनी संक्रांतीसाठी पालेभाज्या व इतर वस्तूंची खरेदी करून आनंद घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटन तेजपृथ्वी ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अनिता खरात यांच्या हस्ते झाले. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून बाजाराचे उद्घाटन केले. यावेळी अनिता खरात म्हणाल्या, ही शाळा माझी शाळा असून इथूनच मी शिक्षण घेतले आहे. या शाळेतील बाजाराच्या उद्घाटनाचा मान मला मिळाल्याने मी खूप आनंदी आहे. शाळेतील वच्चे गुरुजी आणि जाधव गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली ही शाळा अतिशय उत्तम प्रकारे प्रगती करत आहे. भविष्यात या शाळेला कधीही कोणत्याही अडचणीत आम्ही नेहमी मदतीसाठी तयार असू. कार्यक्रमाला सतीश साखरे, लहू साखरे, चांगुनाताई साखरे यांसह मोठ्या प्रमाणावर पालकवर्ग उपस्थित होता.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मल्लिकार्जुन वच्चे गुरुजी आणि जाधव गुरुजी यांनी मेहनत घेतली. कुंभार आणि मुलाणी यांनीही विशेष योगदान दिले.साखरे वस्ती शाळेचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यात शाळा आदर्श ठरण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे या उपक्रमाने अधोरेखित झाले आहे.



## प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास मंडलाधिकाऱ्यांकडून टाळाटाळ, रासनेंचा उपोषणाचा इशारा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे असलेल्या मिळकती संदर्भात सुरू असलेल्या वादात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास मंडळ अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असल्याने २६ जानेवारीला कुटुंबियांसह येथील उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश अनंत रासने यांनी दिला आहे.

या संदर्भात उपोषणाच्या नोटीसमध्ये रासने यांनी म्हटले आहे की, आपल्या मालकीची वडगाव पान येथे मिळकत असून या मिळकतीशी दुरान्वये कोणताही संबंध नसलेल्या काही जणांनी आपल्या मालकीच्या मिळकतीत वहिवाटीस हरकत, अडथळा सुरू केला होता.

तसेच दक्षिण उत्तर बाजूने आपल्या मालकीचे क्षेत्र त्यांच्या वहितीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला होता.त्यामुळे आपण उपाधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे मोजणीसाठी अर्ज दिला होता.या अर्जाप्रमाणे सदर जमिनीची मोजणी होऊन मोजणी अंतिम मिळकतीमध्ये पूर्व बाजूने दक्षिण उत्तर दिशेला १७ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे ते अतिक्रमण काढून टाकण्यासाठी आपण उपविभागीय अधिकाऱ्यांकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अंतर्गत अतिक्रमण अर्ज दाखल केला होता. या अर्जाची चौकशी होऊन उपविभागीय अधिकाऱ्यांनी १७ मार्च २०२३ रोजी निकाल देत वरील मिळकतीमध्ये केलेले अतिक्रमण निष्काशीत करून अतिक्रमित क्षेत्राचा ताबा देण्यासंदर्भात समनापूरच्या मंडळ अधिकाऱ्यांना सूचित केले होते.

उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशावरून समनापूरच्या मंडळ अधिकाऱ्यांनी २५ एप्रिल २०२३ रोजी आदेशाची अंमलबजावणी करत मिळकतीमध्ये प्रत्यक्ष येऊन कार्यवाही सुरू केली असता, वरील व्यक्तींनी संगमनेर न्यायालयाकडून मिळविलेला जैसे थे आदेश मंडळ अधिकाऱ्यांना दाखविला.

त्यामुळे उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. दरम्यान, न्यायालयाने वरील व्यक्तींचा जैसे थे आदेश ३० मार्च २०२४ रोजी नामंजूर केल्याने रासने यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या अतिक्रमण काढण्या संदर्भातील आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली.

या अनुषंगाने मंडळ अधिकाऱ्यांनी २६ डिसेंबर २०२४ रोजी रासने यांना आदेशाची अंमलबजावणी करणार असल्याचे कळविले होते.मात्र या दिवशी मंडल अधिकारी फिरकलेच नाही. त्यांनी रासने यांना तहसील कार्यालयात बोलावून घेत तहसीलदार यांचे मार्गदर्शन घेऊन कारवाई करणार असल्याचे पत्र दिले.त्यामुळे रासने यांनी ७ जानेवारी रोजी मंडळ अधिकारी समनापूर यांची भेट घेऊन या संदर्भात कारवाई करण्याची विनंती केली असता,त्यांनी रासने यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही.यामुळे मंडलाधिकारी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याने प्रजासत्ताक दिनी कुटूंबियांसह संबंधितांचे लक्ष वेधण्यासाठी उपोषणास बसणार असल्याचे रासने यांनी म्हटले आहे.

## गुन्हेगारी रोखण्यास पोलीस ठरले अपयशी नेवासकरांनी दिला आंदोलनाचा इशारा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नेवासा – शहरासह परिसरात वाढत्या चोऱ्या घरफोड्या, खुन, दरोडे, दुचाकी – चारचाकी वाहनांच्या होत असलेल्या चोऱ्या रोखण्यास नेवासा पोलीस सध्या सपशेल अपयशी ठरत आहेत, त्यामुळे जनतेतून पोलीसांबाबत संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे नेवासा पोलीसांनी गुन्ह्यातील चोर पकडल्यास पोलीसांना खुलेआम बक्षीस देऊन त्यांचा नागरी सत्कार करण्याचे आव्हानही नेवासकर मंडळी पोलीसांना करु लागली आहे.




नेवासा शहरात सुरु असलेल्या अवैध धंद्यांवर नगर गुन्हे शाखेचे पोलीस पथक दिवसाआड धाड घालून लाखो रुपयांचा ऐवज हस्तगत करत आहेत, असे असताना नेवासा पोलीसांना हे अवैध धंदे का दिसत नाहीत? असा थेट सवाल या निमित्ताने सध्या नेवासकर करतांना दिसून येत आहेत.नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक धनंजय जाधव यांनी नेवासा पोलीस ठाण्यात एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण केला आहे. मात्र नेवासा पोलीस ठाण्याच्या परिसरातील चोऱ्यांचा तपास नेवासा पोलीस करण्यास सपशेल अपयशी ठरत असल्यामुळे जनतेतून पोलीसांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत. अवैध धंदे चालक आणि नेवासा पोलीस यांच्यामध्ये असलेल्या मिलीभगतीमुळेच गुन्हे शाखेचे पोलीस दिवसाआड नेवाशात येवून कारवाईचा बार उडवून देत आहे. यामुळे आता नेवासा पोलीसांचा बुरखा फाडला जात आहे. त्यामुळे नेवासा पोलीसांची प्रतिमा दिवसेंदिवस मलीन होत चालली आहे. याप्रकरणी आता गुन्ह्यांचा योग्य तपास करून चोरटे जेरबंद करणे गरजेचे आहे, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा नेवासकरांनी दिला आह

# ब्ल्यू डायमंड आंत्रप्रेनर्स क्लब व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे महिला उद्योजक मार्गदर्शन मेळावा




**हिंगणा | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त ब्ल्यू डायमंड आंत्रप्रेनर्स क्लब आणि महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या (एम) हिंगणा सबसेंटरद्वारे दुर्बल घटकातील महिलांसाठी महिला उद्योजक व रोजगार मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हिंगण्याच्या डिगडोह, निलडोह व इसासणी भागात हा कार्यक्रम संपन्न झाला.मेळाव्याचे उद्घाटन एमसिईडी चे विभागीय अधिकारी हेमंत वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ब्ल्यू डायमंड आंत्रप्रेनर्स क्लबचे अध्यक्ष आणि जीएसटी ऑफिसर राजू गायकवाड, ॲड. प्रतिक बागडे, निकिता सक्सेना, सह्याद्रीचा राखणदार चे मुख्य व्यवस्थापक वैभव शहाणे, तसेच स्थानिक मार्गदर्शक पायल रंगारी आणि राणी मुलतानी प्रमुख उपस्थित होते.कार्यक्रमात महिलांसाठी विविध विषयांवर उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. हेमंत वाघमारे यांनी विभागातर्फे राबवल्या जाणाऱ्या मोफत प्रशिक्षण कार्यक्रमांची आणि विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी महिलांना रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होऊ शकतात, याची दिशा दाखवली. ब्ल्यू डायमंड आंत्रप्रेनर्स क्लबचे अध्यक्ष राजू गायकवाड यांनी उद्योग उभारणीचे महत्त्व विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. त्यांनी महिलांना उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रे तयार करण्यात क्लबकडून मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल, असे आश्वासन दिले. ॲड. प्रतिक बागडे यांनी लहान व्यवसायातून मोठ्या यशाकडे कसे जाता येते, याचे मार्गदर्शन केले. निकिता सक्सेना यांनी महिलांनी आपल्या पायावर उभे राहून स्वतःचा व्यवसाय कसा उभा करावा आणि स्वावलंबी कसे व्हावे, हे पटवून सांगितले. सह्याद्रीचा राखणदार चे मुख्य व्यवस्थापक वैभव शहाणे यांनी उद्योगासाठी माध्यम व जाहिरातीचे महत्त्व अधोरेखित करत त्याचा योग्य वापर कसा करावा, याचा उलगडा केला.या मेळाव्याला स्थानिक महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांनी यावेळी आपले प्रश्न मांडले व तज्ज्ञांकडून त्यावर उपाययोजना जाणून घेतल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोहित रंगारी, पायल रंगारी, राणी मुलतानी तसेच स्थानिक महिलांनी मोलाचे सहकार्य केले.सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्ताने आयोजित हा मार्गदर्शन मेळावा महिलांसाठी प्रेरणादायी ठरला. या उपक्रमामुळे महिलांना उद्योजकतेची नवी दिशा मिळाली असून त्यांचे स्वावलंबन व सक्षमीकरण साध्य होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## राज्यातील विविध प्रश्नांसंदर्भात आमदार सत्यजित तांबे यांची मुख्यमंत्र्यांसोबत भेट

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**



उत्तर महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यासाठी महत्वाच्या असलेल्या विविध मुद्द्यांवर विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांचा गेल्या काही दिवसांपासून सक्रिय पाठपुरावा सुरू आहे. यामध्ये अनेक विषय मार्गी लागले असून, काही समस्यांचे निराकरण होण्याच्या मार्गावर आहेत. याच पार्श्वभूमीवर तांबे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा:

तांबे यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आणि त्यात संगमनेर येथील पोलिस वसाहत प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीसाठी आराखडा आधुनिक पद्धतीने तयार करण्याची मागणी केली. तसेच, राज्यातील डॉक्टरांसाठी वकिलांच्या प्रमाणे संरक्षणासाठी कायदा करण्याची विनंती केली.

मुख्यमंत्र्यांना दिल्या विविध मागण्या:

होमिओपॅथिक डॉक्टरांच्या आणि सीसीएमपी डॉक्टरांच्या प्रश्नांबाबत बैठक आयोजित करावी. अहमदनगरच्या कौटुंबिक न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीशांची नेमणूक करावी. निळवंडे प्रकल्पाच्या नियोजनावर चर्चा करावी. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदानावर नियुक्त शिक्षकांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी. ग्रामीण भागातील प्रलंबित मुद्द्यांवर बैठका आयोजित कराव्यात.

संगमनेर शहरातून वाहणाऱ्या म्हाळुंगी नदी सुधार प्रकल्पासाठी मुख्यमंत्री निधी मंजूर करावा. लघु वृत्तपत्र क्षेत्राच्या प्रलंबित प्रश्नांवर बैठक आयोजित करावी.

तांबे यांचा सक्रिय पाठपुरावा:

आमदार तांबे हे आपल्या कामाचे प्रगती पुस्तक समाज माध्यमांवर आपल्याला दाखवत असतात आणि सभागृहात अनेक मुद्दे उपस्थित करून समस्यांना वाचा फोडत असतात. त्यांनी राज्याच्या विविध समस्यांवर मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करून ते लवकरात लवकर मार्गी लावण्याची विनंती केली आहे.

## अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर महसूल पथकाची कारवाई

### पथक स्थापन होऊन पंधरा दिवस झाले; कारवाई मात्र केवळ दोन वाहनांवर

**पाथरी (लक्ष्मण उजगरे)**




पाथरी तालुक्यातील गोदावरी नदी पात्रामुळे मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याचे नवे नाही. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार एस.एन. हंदेश्वर यांनी २६ डिसेंबर २०२४ रोजी अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासाठी पथक स्थापन केले. मात्र, पंधरा दिवसांमध्ये या पथकाकडून केवळ दोन वाहनांवरच कारवाई झाल्याचे समोर आले आहे.

गुरुवार, ९ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता ढालेगाव येथे गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी लाहोटी यांना मिळाली. त्यानुसार ग्राम महसूल अधिकारी आर.यू. शर्मा आणि मंडळ अधिकारी शिवाजी भरकड यांनी संबंधित वाहन ताब्यात घेतले व तहसील कार्यालय पाथरी येथे आणले. नाथरा येथे गोदावरी नदी पात्रातून केनिच्या सहाय्याने वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळताच महसूल पथकाने पाहणी केली. ग्राम महसूल अधिकारी साजिद सय्यद, विजय भदर्गे, संदीप बडगुजर आणि आदनान अन्सारी यांच्या पथकाने महिंद्रा ट्रॅक्टरसह साहित्य जप्त केले आणि तहसील कार्यालयात आणले.

जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली ८ जानेवारी रोजी झालेल्या आढावा बैठकीत अवैध गौण खनिज उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने अधिक कडक उपाययोजना करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी स्पष्ट केले.महसूल पथकाच्या कारवाईची गती कमी असल्याने जनतेत नाराजी आहे. कारवाई अधिक तीव्र करण्याची मागणी जोर धरत आहे.

## देवगड येथील 'श्री गुरुदेव दत्त पिठास' राजस्थानचे राज्यपाल बागडे यांची भेट!

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**



नेवासा तालुक्यातील तीर्थक्षेत्र देवगड येथील श्री गुरुदेव दत्त पिठास राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी शुक्रवारी (दि.१०) जानेवारी रोजी भेट दिली. आपल्या संस्कृतीवर अनेकांकडून प्रहार करण्याचे प्रयत्न झाले मात्र चिवट श्रध्दा व भक्तीतून साधूसतांनी धर्म व संस्कृती जपली म्हणून आज देशाची संस्कृती व परंपरा अबाधित आहे.

ही संस्कृती व परंपरा जपा व तिला वाढविण्याचा प्रयत्न करा असे आवाहन राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी यावेळी केले. राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे देवगड येथे आगमन झाल्यानंतर राष्ट्रीय संत गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज, प्रकाशानंदगिरीजी महाराज, सुनीलगिरीजी महाराज, गोपालानंदगिरीजी महाराज, ऋषिनाथ महाराज, विठ्ठलराव लंघे, दिनकर मते यांच्या समवेत उपस्थित मान्यवरांचे झांज पथकाच्या निनादात स्वागत केले.

यावेळी बोलतांना भास्करगिरी महाराज म्हणाले की, राज्यपाल झालेल्या बागडे यांनी जीवनात धर्म कार्यासह त्याग व समर्पित भावनेने राष्ट्राकरिता काम केले व करत आहे. त्यांच्या अंतकरणातील भाव हा राष्ट्राकरता व समाजाकरता असून मिळालेल्या सर्व पदांचा त्यांनी सन्मान केला. त्यांनी यावेळी बोलतांना त्यांनी देश सेवा व दुःख पीडितांची सेवा त्यांच्याकडून होत राहील असा शुभाशिर्वाद दिला.राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले की, आपली संस्कृती परंपरा धर्म संपविण्यासाठी व श्रध्दा नष्ट करण्यासाठी यापूर्वी अनेकांनी प्रयत्न केले मात्र साधू संतांनी अशाही परिस्थितीत आपल्या श्रद्धेने व चिवट भक्तीने धर्म टिकविण्याचे कार्य केले म्हणूनच आज आपण ही आज टिकलो आहे. असे स्पष्ट करून आज देवा धर्माचे काम भारत सरकार करत आहे आपल्या देशासह इतर देशात ही मंदिरे उभारली जात आहे, देशाच्या सरकारच्या खंबीर साथीचे हे चित्र असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पन्नास वर्षाच्या सेवाकार्याच्या सोहळयासाठी मी पुन्हा येईन – हरिभाऊ बागडेभास्करगिरी देवगड सेवा कार्याला पन्नास वर्षे पूर्ण होत असल्याने तालुक्याच्या वतीने संत महंतांच्या उपस्थितीत गौरव सोहळा करण्याची माझी इच्छा असून त्यासाठी बाबांनी मला अनुमती द्यावी अशी विनंती आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी आपल्या भाषणातून केल्यानंतर हा सोहळा आपण जरूर करावा त्यासाठी मी पुन्हा येईन अशी ग्वाही बागडे यांनी यावेळी बोलतांना दिली.

## मॅग्निज चोरीप्रकरणी दोन आरोपींना अटक;अवैध माल जप्त

**भंडारा | प्रतिनिधी**



गोबरवाही-चिखला खाण क्षेत्रातून मॅग्निज चोरी करून अवैध वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना गोबरवाही पोलिसांनी अटक केली. दि. १० जानेवारी २०२५ रोजी रात्री २ वाजता हिरापुर हमेशा गावाजवळ नाकाबंदी करताना ही कारवाई करण्यात आली.

यात हिरव्या रंगाची महिंद्रा बोलेरो (विनानंबर) – किंमत २,००,०००/-, २० प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरलेला मॅग्निज (काळा दगड) – १६०० किलो, किंमत ८०,००० माल जप्त करण्यात आला .

आरोपी क्रमांक १) आकाश मोडकु नागपुरे (वय २४ वर्षे, रा. नाकाडोंगरी, ता. तुमसर) याला वाहनासह ताब्यात घेतले असता, तो चोरी केलेला मॅग्निज वाहतूक करताना आढळला. चौकशीत त्याने सांगितले की, आरोपी क्रमांक २) जाफर जिब्राईल शेख (वय ३४ वर्षे, रा. चिखला, ता. तुमसर) याच्या सांगण्यावरून तो हा माल चिखला खाण क्षेत्रातून चोरून त्याच्या प्लांटवर नेहमीच पोहोचवत होता. गोबरवाही पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा क्रमांक ०८/२०२५ अंतर्गत भारतीय दंड विधान कलम ३०३(२), ४९ नुसार गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार लंकेश्वर राघोर्ते करत आहेत. गाडी व मॅग्निजसह जप्त मालाची किंमत ,८०,०००/- असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे खाण क्षेत्रातील अवैध चोरी व वाहतूक रोखण्यास मोठा हातभार लागणार आहे.

## नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा ; ९०० खेळाडूंचा सहभाग



**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेत पाच जिल्ह्यातील सुमारे ९०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. यात स्पर्धेत ३०० महिला खेळाडूंचा समावेश आहे. नाशिक परिक्षत्रिय ३५ वी पोलीस क्रीडा स्पर्धा २०२४-२५ अहिल्यानगर, नाशिक ग्रामीण, नाशिक शहर, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्याचा समावेश आहे. या स्पर्धेत कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, हँडबॉल, हॉकी, बॉक्सिंग, फुटबॉल, बास्केटबॉल, कुस्ती, तायक्कांदो, वेट लिफ्टिंग, थलेटिक्स, वुशू खेळांचा सहभाग आहे. या स्पर्धा यशस्वीतेसाठी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, पोलीस उपनिरीक्षक व्हिक्टर जोसेफ, सह्हायक पोलीस उपनिरीक्षक शकील शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शुक्रवारी ता. १० रोजी मेजर जनरल विक्रम वर्मा, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्ताराम कराळे यांच्या उपस्थित होणार आहे.

## नगदी पिकांमुळे शेवगावमध्ये ज्वारीच्या क्षेत्रात घट

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**



शेवगाव तालुक्यात रब्बी हंगामात ज्वारी पिकाला महत्वाचे स्थान दिले जात असे.त्याचे कारण असे सध्या तालुक्यात कपाशी पिकाचा जो पेरा होत आहे, त्यापेक्षाही कितीतरी पटीने या पूर्वी ज्वारी पिकाचा पेरा होत होता; परंतु आता ऊस व कपाशी या दोन नगदी पिकांकडे शेतकरी वळल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून शेवगाव तालुक्यातील ज्वारी पिकाच्या क्षेत्रात घट झाली. परिणामी धान्य मार्केटमध्ये ज्वारीची अत्यंत कमी प्रमाणात आवक होताना दिसून येत आहे. पूर्वी ज्वारी पिकासोबतच करडी पिकाचेही चांगल्या प्रकारे उत्पादन होत होते.काही शेतकरी ज्वारीच्या पिकात करडीचे पाटे पेरायचे तर काही शेतकरी आपल्या पूर्ण क्षेत्रात करडीची पेरणी करत असे. मात्र, गेल्या काही वर्षापासून शेतकऱ्यांनी या दोन्हीही पिकांकडे पाठ फिरवली असल्याचे दिसून येत आहे.ज्वारीची काढणी जवळपास २ महिन्यांपेक्षाही जास्त काळ चालत असे.ज्वारी काढणारे मजूर डफड्याच्या तालावर भलरी गाणी म्हणायचे. ज्वारीचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असल्याने त्याकाळी अनेक शेतकऱ्यांच्या घरी शेतातील पिकलेल्या ज्वारीच्या राशीच्या राशी भरून राहत होत्या.

आशिया खंडात अहिल्यानगर जिल्ह्याची सहकार क्षेत्रात कायम ओळख राहिली असून, साखर कारखानदारीमध्ये राज्यात जिल्हा एक नंबला आजही आहे. सुरुवातीपासून जिल्ह्यात ज्वारी हे मुख्य पीक असताना गेल्या काही वर्षापासून या पिकापासून शेतकरी दुरावला गेला असल्याचे दिसून येत आहे.

## लॉयन्स क्लब गंगाखेड गोल्डसिटी व टॅक्स असोसिएशन परभणीच्या वतीने कर अनुपालन सेमिनारचे आयोजन

**गंगाखेड | प्रतिनिधी**




लहान-मोठ्या व्यापाऱ्यांसाठी लॉयन्स क्लब गंगाखेड गोल्डसिटी, टॅक्स असोसिएशन परभणी व एक्सल सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज (१२ जानेवारी) सायंकाळी ४ ते ७ वाजता राजेश्वर फंक्शन हॉल येथे कर अनुपालन या विषयावरील एक दिवसीय सेमिनार आयोजित करण्यात आला आहे.

या सेमिनारमध्ये टॅली, जीएसटी, इन्कम टॅक्स आणि लघु-मध्यम उद्योगांसाठी शासनाच्या योजनांची माहिती दिली जाणार आहे. उद्योजकांसाठी आर्थिक सहाय्य, सबसिडी योजनांचे महत्त्व आणि व्यवसाय वृद्धीसाठी उपाय याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. कार्यक्रमास सीए श्याम धूत, सीए अरुणकुमार ओझा, सीए कुशल गंगवाल, संपत पाठक, सुमित सिंह आणि संतोष सांगळे हे प्रमुख मार्गदर्शक असतील. यावेळी गंगाखेडमधील उद्योजकांचा सत्कारही करण्यात येणार आहे. सर्व व्यापारी बांधवांनी या सेमिनारस उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सेमिनारच्या शेवटी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# वीस वर्षापासून चक लोहारा वासिय रस्त्याच्या प्रतीक्षेत

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथून जवळच असलेल्या तीन किलोमीटर अंतरावर चक लोहारा वासिय रस्त्यासाठी वीस वर्षांपासून प्रतीक्षेत आहे. हे गाव चकजाटेपार या गट ग्रामपंचायत मध्ये येत असून जवळपास ६०० लोक वस्तीतचे गाव आहे. या गावाला जाण्यासाठी शंकरपुर चकजाटेपार रस्ता असून या रस्त्यापासून आत मध्ये एक किलोमीटर अंतरावर वाघाई डोंगर पायथ्याशी हे गाव बसलेले आहे. पंचवीस वर्षा आधी चक लोहारा रस्त्याच डांबरीकरण झालं होतं. तेव्हापासून हा रस्ता पक्का रस्ता म्हणून गणल्या जात होता. परंतु आता हा रस्ता पूर्णपणे उखडलेला असून जागोजागी खड्डे पडलेले आहे. साधी सायकल सुद्धा या रस्त्याने चालविणे कठीण झाल्याचे दिसून येत आहे. हा रस्ता चक जाटेपार पार रोडच्या टी पॉइंट वरून केवळ एक किलोमीटर वर लोहारा हे गाव आहे. या रस्त्यासाठी वारंवार प्रशासनाकडे मागणी करण्यात आली. परंतु अजून पर्यंत हा रस्ता डांबरीकरण झालेले नाही. हे गाव जंगलालां लागून असून वाघाई पहळाच्या पायथ्याशी असून येथे वाघाई देवस्थान आहे दरवर्षी जानेवारी महिन्यात येथे यात्रा भरत असते. येथे नवस फेडण्यासाठी भाविक भक्तगण येत असतात. तसेच या डोंगर पायथ्याशी डोंगरगाव तलाव आहे. लोहारा गावालगत असलेला तालुक्यातील तिसऱ्या नंबरचा सर्वात मोठा तलाव समजल्या जातो. या तलावाचे सौंदर्यकरण बघण्यासाठी पर्यटक नेहमी येत असतात. परंतु हा रस्ता अजून पर्यंत पूर्ण झालेला नाही. दोन किलोमीटरचा रस्ता अतिशय खड्डे कुठे डांबरीकरण पूर्णपणे उघडलेलं आहे. गावकऱ्यांनी जाण्या येण्यासाठी रस्त्याच्या बाजूनेच कच्चा रस्त्या तयार करून तेथून जाणे येणे करीत आहेत. परंतु याही रस्त्यावर पावसाळ्यामध्ये चिखल होत असल्याने वर्दळ करणे कठीण होत आहे. त्यामुळे हा रस्ता प्रशासनांना तात्काळ करून द्यावा अशी गावकऱ्यांची मागणी केली आहे.

मागील वर्षीच्या उन्हाळ्यात या रस्त्याच काम सुरू करण्यात आलं होतं. एक दोन ट्रक गीट्टी टाकून रस्ता सुरू केला होता. परंतु नंतर काम बंद करण्यात आलेलं होतं. अजून पर्यंत ते काम पूर्ण झालेलं नाही. त्यामुळे शासनाने याकडे लक्ष देऊन हा रस्ता तात्काळ दुरुस्त करून द्यावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

बंडू ठाकरे ग्रा प सदस्य चकजाटेपार



# इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत श्री टागोर माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश



चि.पार्थ आगे | चि.सिध्दार्थ गर्दनमारे | चि.विशाल गर्दनमारे | कु.हिमांसी जगताप | कु.गौरी साबळे | कु.साक्षी कांबळे | कु.शिवानी सपकाळ

**सोलापूर । प्रतिनिधी**

इंद्रायणी नगर, भोसरी येथील श्री टागोर शिक्षण संस्थेच्या श्री टागोर माध्यमिक विद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. यामध्ये इयत्ता आठवी ते दहावीतील ४६ विद्यार्थ्यांनी शासकीय इंटरमिजिएट परीक्षेत भाग घेतला होता. त्यात ७ विद्यार्थी 'ए' ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. हे विद्यार्थी आहेत – पार्थ प्रमोद आगे, साक्षी राजेंद्र कांबळे, शिवानी गणेश सपकाळ, सिद्धार्थ संगपाल गर्दनमारे, गौरी मच्छिंद्र साबळे, हिमांशी प्रवीण जगताप.

'बी' ग्रेडमध्ये २३ विद्यार्थी आणि 'सी' ग्रेडमध्ये १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशामुळे इयत्ता दहावीच्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना टक्केवारीत मोठा फायदा होणार आहे. यावेळी श्री टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचे चेअरमन नंदकुमार लांडे पाटील, उपाध्यक्ष महेश घावटे, संस्थेचे सचिव सुरेश फलके, युवराज बापू लांडे, सुरज लांडे (स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष) यांच्यासह इतर मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शालेतील सहशिक्षक सतीश क्षीरसागर सर, चित्रकला विभाग प्रमुख विठ्ठल बुळे आणि श्रीमती पल्लवी कौटे यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना यश मिळाले. याशिवाय शाळेतील इतर शिक्षकांनीही कठीण परिश्रम घेतले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक मुख्याध्यापक हनुमंत आगे, परीक्षा केंद्र संचालक संतोष काळे, मनीषा गुरव, उद्धव ढोले आणि पर्यवेक्षक शिवाजी गुरव यांनी केले

# बोरगाव येथे बाल आनंद बाजार संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

आज, १० जानेवारी २०२५ रोजी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद बाजार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर मेळाव्याचे उद्घाटन दीपक भोज, अध्यक्ष शा.व्य. समिती आणि संजय शिंदे, सदस्य शा.व्य. समिती यांनी केले.बाजारात विद्यार्थ्यांनी विविध वस्तूंच्या दुकानदारांनी आपली दुकाने लावली होती, ज्यात फळे, पालेभाज्या, फळभाज्या, अंडी, वडापाव, भजी, चायनीज, भेळ, चहा इत्यादींचा समावेश होता. या मेळाव्यात एकूण ३१,५०० रुपयांची उलाढाल झाली. हे बाजाराचे दुसरे वर्ष होते.



उपक्रमाला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघाचीवाडीच्या मुख्याध्यापिका शयोगिता हेंद्रे, संजय गर्जे , दिलमेश्वर शाळेचे मुख्याध्यापक गोकुळ कोकाटे यांनी भेट दिली. यावेळी गावातील सर्व नागरिकांनी आपल्या मुलांचे कौतुक केले आणि खरेदीचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान मिळाले तसेच त्यांना व्यवसाय करण्याचा आत्मविश्वास वाढला. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, शाळा प्रेमी नागरिक, आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका मंगल माने, उपशिक्षक श्रीराम बुलबुले, आणि धनंजय काटुळे यांनी परिश्रम घेतले.आखरीत, श्रीराम बुलबुले यांनी उपस्थितांचे आणि मान्यवरांचे आभार मानले.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात देशभक्त कै.जगताप यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

**सोलापूर । प्रतिनिधी**

येथील विद्या विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आणि देशभक्त स्वर्गीय नामदेवराव जगताप यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मा. प्राचार्य मिलिंद फंड यांनी स्वर्गीय नामदेवराव जगताप यांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांची करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठीची महत्त्वाची कामे उलगडून सांगितली. उजनी धरण, मांगी धरण, कुकडी प्रकल्प राबवून त्यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी योगदान दिले. तसेच गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्या विकास मंडळाच्या अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची स्थापना केली, असे त्यांनी गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाला विद्या विकास मंडळाचे सचिव श्री. विलासराव घुमरे, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, तसेच महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ कला, वाणिज्य, विज्ञान विभागांचे प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाच्या डॉ. वंदना भाग्यवंत यांनी केले, तर आभार प्रा. हनुमंत भोंग यांनी मानले. कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# माजी विद्यार्थ्यांची २५ वर्षांनी पुन्हा भरली शाळा; १९९९–२००० च्या आठवणींना उजाळा



**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा मांजरी येथील १९९९–२००० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी २५ वर्षांनंतर स्नेहसंमेलनाचे आयोजन केले. ही अविस्मरणीय भेट हॉटेल अजिंठा येथे संपन्न झाली. या स्नेहमेळाव्यात शिक्षक ह.भ.प. काकासाहेब गणगे, श्यामराव रावते आणि गोविंद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देत शाळेतील गमतीजमती, आठवणी, आणि शालेय जीवनातील अनुभवांना उजाळा दिला. शाळेतील सवंगडी, लाकडी बाक, वर्ग यांचा उल्लेख करत त्यांनी जुन्या आठवणींमध्ये रममाण झाल्याचे दिसून आले. यावेळी समाजात वावरताना येणाऱ्या अडचणींवर एकमेकांना सहकार्य करण्याची भावना व्यक्त करण्यात आली.

शाळा सोडल्यानंतर पुन्हा लाकडी बाकांवर बसण्याची इच्छा व्यक्त करत अशा स्नेहसंमेलनांचे आयोजन वारंवार व्हावे, अशी अपेक्षा माजी विद्यार्थ्यांनी मांडली. यानंतर उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन गणेश सुंब, गणपत धनवटे, रवी लोखंडे, सिताराम गीते, वरना कोळसे, नीता क्षीरसागर, रूपाली जाधव आणि संगीता जंजाळे यांनी केले. त्यांच्या परिश्रमांमुळे कार्यक्रम थाटात पार पडला. या स्नेहमेळाव्यामुळे माजी विद्यार्थ्यांच्या जीवनातील आठवणींना नवा उजाळा मिळाला असून या क्षणांनी सर्वांच्या मनात आनंदाचे स्थान निर्माण केले.

# युवा दिवस मोठ्या उत्साहात साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक इंडियन मिलिटरी स्कूल येथे स्वामी विवेकानंद यांची जयंती आणि राजमाता जिजाऊ महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्वामी विवेकानंद यांची जयंती 'राष्ट्रीय युवा दिवस' म्हणून साजरी केली जाते. या विशेष दिनाचे औचित्य साधून शाळेत क्रॉस कंट्री रनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




स्पर्धेत विद्यार्थ्यांचे दोन गट पाडण्यात आले होते – वर्ग ६ ते ८ आणि वर्ग ९ ते १२. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या धावण्याच्या कौशल्याचे प्रदर्शन केले. वर्ग ६ ते ८ गटात सागर उमाटे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, रोहन देवतळे यांनी द्वितीय आणि यश भाकरे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. वर्ग ९ ते १२ गटात गिरीश गौतम प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले, समीर मडकाम द्वितीय आणि भावेश लड्डारे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना कमांडर कर्नल के. एच. पाटील आणि शाळेचे सुपरवायझर नितीन कोठे यांच्या हस्ते सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके प्रदान करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे युवा दिवस साजरा करण्यास उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

# गॅलेक्सी इंग्लिश मीडियम स्कूलचा स्नेहसंमेलन सोहळा साजरा

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील गॅलेक्सी इंग्लिश मीडियम स्कूलचा स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रम हनुमान किल्ला मंदिर शंकरपूर येथे दिनांक ७ व ८ जानेवारी २०२५ रोजी थाटात पार पडला.

या कार्यक्रमांमध्ये चिमुकल्यांनी आपल्या विविध कलागुणांनी नृत्य, नाटिका, फॅन्सी ड्रेस धारण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्यध्यापिका आरती राजेश भांडारकर तर प्रमुख पाहुणे गॅलेक्सी इंग्लिश मीडियम स्कूलचे संचालक राजेश रामभाऊ भांडारकर , ज्येष्ठ नागरिक विजयराव शुक्ला, प्रमुख अतिथी म्हणून उद्धवरावजी खाडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अश्विनीताई नागोसे उपस्थित होते.




या मान्यवरांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करून व स्नेहसंमेलनाचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. तसेच दिनांक ८ जानेवारी रोजी बक्षीस वितरण सोहळा साजरा करण्यात आला, याप्रसंगी पंचायत समिती चिमूर चे शिक्षण विस्तार अधिकारी स्वप्निल खांडेकर , संचालक राजेश भांडारकर , मुख्याध्यापिका आरती भांडारकर , विषय तज्ञ जि प आंबोलीचे वांढरे तर प्रमुख पाहुणे रीना ताई खाडे, अश्विनीताई नागोसे यांनी विद्यार्थ्यांना मोलाची मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका वैशाली गायकवाड यांनी केले तर आभार शाळेच्या शिक्षिका वैशाली सामुसाकडे यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षिका,विद्यार्थी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी महाप्रसाधने स्नेहसंमेलनाची सांगता करण्यात आली.

# निराधार लोकांचे अनुदान त्वरित द्या उपसरपंच अशोक चौधरी

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील निराधार अपंग विधवा व वृद्ध लाभार्थ्यांना गेल्या चार महिन्यापासून अनुदान मिळाले नसून त्यांची परिस्थिती हलाकीची होत चाललेली आहे. त्यामुळे त्यांना तात्काळ शासनाने थकलेले वेतन लवकर लवकर देण्यात यावे, अशी मागणी शंकरपूर ग्रामपंचायत तिचे उपसरपंच अशोक चौधरी यांनी निवेदनाद्वारे तहसीलदारांना केलेली असून तहसील कार्यालय समोर भिक मांगो आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.




चिमूर तालुक्यात हजारो वृद्ध अपंग निराधार लोक आहेत. त्यांनी शासनाच्या विविध योजना अंतर्गत अर्ज मंजूर केलेले आहेत. त्यांचे अर्ज मंजुरी झाले असून दर महिन्याला पंधराशे रुपये मिळत आहेत. परंतु मागील ऑक्टोबर २०२४ पासून या सर्व लोकांचे सानुग्रहाणू अनुदान निधी थकलेली आहे. त्यामुळे त्यांच्या इतर गरजा भागवण्यासाठी हलाखीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. हे वेतन न मिळाल्यामुळे सर्व लाभार्थ्यांना आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. या लाभार्थ्यावर सध्याच्या परिस्थितीत उपासमारीची वेळ आली आहे. तसेच त्यांच्या दैनंदिन गरजाही भागविणे कठीण झाले असून वैद्यकीय उपचार वेळेवर होऊ शकत नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांना तात्काळ वेतन देण्यात यावे, अशी मागणी उपसरपंच अशोक चौधरी यांनी चिमूर चे तहसीलदार श्रीधर राजमाने यांना एका निवेदनाद्वारे दिली आहे. या लाभार्थ्यांना त्वरित लाभ न दिल्यास तहसील कार्यालयासमोर भिक मांगो आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनातून दिलेला आहे

# वराठी ग्रामपंचायत अधिकारी मोतीसिंग भस्मे निलंबित

## मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड यांनी केली कारवाई

## महाड,पोलादपूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

**महाड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी जनतेला सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी १०० दिवसांचा महत्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, प्रत्येक तालुक्याच्या पातळीवर आढावा बैठकांचे आयोजन केले जात आहे. तसेच, कामचुकार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जात आहे. महाड, पोलादपूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला गैरहजर राहणारे वराठी ग्रामपंचायत अधिकारी मोतीसिंग लहानुजी भस्मे यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी निलंबित केले आहे.

भस्मे यांनी बैठकला विनापरवानगी गैरहजर राहण्यासोबतच १५ व्या वित्त आयोगाचा खर्च कमी करणे आणि प्रधानमंत्री आवास योजना कामात जाणून-बुजून दुर्लक्ष केल्याने या कारवाईला तोंड फुटले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी या आढावा बैठकीत १०० दिवसांच्या महत्वाकांक्षी उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना, १५व्या वित्त आयोगाचा खर्च १०० टक्के करणे आणि स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केलेली कामे यांचा आढावा घेतला. या बैठकीस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, महाडच्या गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, पोलादपूरच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट, सहाय्यक गटविकास अधिकारी नामदेव आण्णा कटरे तसेच सर्व विस्तार अधिकारी आणि शाखा अभियंते उपस्थित होते.



# पत्रकार सुरक्षा समिती धाराशिव जिल्हा व तुळजापूर तालुका कार्यकारणी जाहीर

**माळशिरस (श्रीकृष्ण देशपांडे)**

पत्रकार सुरक्षा समिती वतीने गेल्या आठ वर्षांपासून ज्येष्ठ पत्रकारांसाठी समान पेन्शन योजना, प्रभावी पत्रकार संरक्षण कायदा, राज्यातील साप्ताहिक वृत्तपत्रांना शासकीय जाहिराती, युट्यूब व पोर्टलला शासकीय मान्यता, पत्रकारांसाठी आरोग्य योजना, विमा योजना, घरकुल योजना आणि टोलमधून सूट मिळवण्यासाठी राज्य सरकारकडे निवेदन पाठवले जात आहेत. तसेच खंडणे सारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तपासाची मागणी आणि पत्रकारांसाठी वयोवृद्ध संपादकांना दर महिन्याला वीस हजार रुपये पेन्शन देण्याची मागणी केली जात आहे.तुळजापूर येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार सुरक्षा समितीच्या बैठकीत धाराशिव जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.



धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी राहुल कोळी, जिल्हा उपाध्यक्षपदी रुपेश डोलारे, जिल्हा कार्याध्यक्षपदी संजय गायकवाड, जिल्हा संघटकपदी सर्जेराव गायकवाड, सह संघटकपदी अहमद अन्सारी यांची निवड करण्यात आली. तुळजापूर तालुका कार्यकारणीमध्ये तालुकाध्यक्षपदी चांद शेख, तालुक उपाध्यक्षपदी सारिका चुंगे, तालुका कार्याध्यक्षपदी हैदर शेख, तालुका सचिवपदी मकबूल तांबोळी, तालुका संघटकपदी प्रशांत गरड, तालुका सहसचिवपदी गणेश कांबळे, तालुका उपाध्यक्षपदी सचिन शिंदे आणि सदस्यपदी राम थोरात यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत पवार, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रामचंद्र सरवदे, प्रदेश उपाध्यक्ष किरण बाथम, प्रदेश संघटक गणेश जाधव, मराठवाडा विभाग अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, कार्याध्यक्ष प्रवीण राठोड, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रमोद भैस, संघटक मिर्झा गालिब मुजावर, कार्याध्यक्ष तानाजी माने, सोलापूर जिल्हा अध्यक्ष राम हुंडारे, कार्यकारी जिल्हाध्यक्ष संतोष म्हेत्रे, जिल्हा कार्याध्यक्ष अतुल भडंगे, जिल्हा संघटक सादिक शेख आणि जिल्हा प्रसिद्ध प्रमुख श्रीकृष्ण देशपांडे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# वर्धा नगरीत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याने उत्साहाचा जल्लोष



**वर्धा । प्रतिनिधी**

जागतिक पारायण सोहळ्याच्या निमित्ताने वर्धा नगरी टाळ-मृदुंगाच्या गजराने दुमदुमली आहे. सर्कस ग्राउंड येथून गजानन महाराजांच्या पालखीचे भव्य आयोजन करण्यात आले. या पालखी सोहळ्याला वर्धेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

टाळ-मृदुंगाच्या तालावर व गजानन महाराजांच्या गण गण गणात बोते च्या गजरात वर्ध्याच्या रस्त्यांवर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. या सोहळ्यात अनेक भजनी मंडळांचा सहभाग असून त्यांच्या भजना-मधून भक्तिरसाचा वर्षाव झाला. वारकऱ्यांनी खेळलेली फुगडी आणि रिंगण हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले.भगव्या पताका हातात घेऊन मोठ्या संख्येने गजानन भक्त रस्त्यांवर उतरले होते. भक्तांचा उत्साह, टाळ-मृदुंगाचा गजर, आणि गजानन महाराजांचा जयघोष यामुळे वर्ध्याची नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली.पालखी सोहळा वर्ध्याच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवणारा ठरला असून, सर्वत्र भक्तिमय वातावरणाने भारावलेले दिसत होते.

# कल्याण शिळफाटा रोडवर बसला अचानक लागली भीषण आग

## चालकाच्या समयसुचकतेमुळे मोठा अनर्थ टळला!

**बदलापूर । प्रतिनिधी**

कल्याण-शिळफाटा रस्त्यावर मानपाडा हद्दीतील रुणवाल चौक येथे नवी मुंबई पालिका परिवहन सेवेच्या बसला गुरुवारी अचानक आग लागली असून आग लागताच चालकाने प्रवाशांना उतरण्याचा इशारा दिला. याठिकाणी गस्तीवर असलेल्या कोळसेवाडी शाखेच्या वाहतूक पोलिसांनी तातडीने बसमधील २२ प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले. या आगीत जीवित हानी झाली नाही. बसला आग लागताच रस्त्याच्या दुतर्फे वाहतूक पोलिसांनी तातडीने रोखून ठेवली, त्यामुळे काही वेळ रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली.

नवी मुंबई पालिका परिवहन सेवेची बस गुरुवारी सकाळी साडे दहा वाजता २२ प्रवासी घेऊन कल्याण दिशेने जात होती. शिळफाटा रस्त्यावरील मानपाडा हद्दीतील रुणवाल चौकात बस येताच अचानक बसमधून धूर येऊ लागला आणि बसला आग लागली. चालकाने तत्परतेने प्रवाशांना बसमधून उतरायला सांगितले. प्रवाशांनी स्वतः बसमधून उडी मारली आणि सुरक्षितपणे बाजूला थांबले. या भागात सकाळच्या वेळी कोळसेवाडी वाहतूक विभागाचे पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियोजनासाठी तैनात होते.

बसला आग लागल्याची माहिती मिळताच गस्तीवरील वाहतूक पोलिसांनी तत्काळ रस्त्यावरील वाहतूक रोखून धरली, अन्य कोणत्याही दुर्घटनेला प्रतिबंधित करण्यासाठी विशेष खबरदारी घेतली. तातडीने एक टँकर घटनास्थळी बोलावण्यात आला. टँकरच्या सहाय्याने कोळसेवाडी वाहतूक विभागाचे उपनिरीक्षक व त्यांच्या सहकाऱ्यांनी बसला लागलेली आग अर्ध्या तासात शांत केली. नंतर तातडीने क्रेन घटनास्थळी बोलावण्यात आली आणि



आगीत जळून खाक झालेली बस रस्त्याच्या बाजूला उचलण्यात आली.

आग लागली त्या वेळी ज्वलनशील पदार्थ वाहत असणाऱ्या ट्रक, टॅन्कर या भागातून धावत असत, त्यामुळे पोलिसांनी अधिक काळजी घेतली. सकाळी वाहनांची प्रचंड वर्दळ असलेल्या वेळेत बस पेटण्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. मात्र पोलिसांच्या वेळोवेळीच्या कारवाईमुळे अधिक मोठा अनर्थ टळला. या बसमधील प्रवासी विशेषतः खासगी वाहने, रिक्षेने इच्छित स्थळी निघून गेले. या घटनेमुळे वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी तातडीने योग्य उपाययोजना केल्या असून प्रवाशांची सुरक्षितता प्राथमिकता मानली गेली.

# मोखाळा येथे लोकमान्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन

**वरोरा । प्रतिनिधी**

लोकमान्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या विशेष शिबिराचे उद्घाटन मोखाळा येथे दिनांक १० जानेवारी रोजी पार पडले. हे विशेष शिबिर दिनांक १० जानेवारी ते १६ जानेवारी या कालावधीत माझा विकसित भारत, डिजिटल साक्षरता आणि मतदान जनजागृतीकरिता युवाशक्ती शिबिर या संकल्पनेवर आधारित आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे हे विशेष शिबिर सलग दुसऱ्यांदा या गावात होत असल्याचा आनंद सर्वांना झाला आहे.





या उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लोकमान्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शास्त्री उपस्थित होते. तर उद्घाटक म्हणून प्रा. श्रीकांत पाटील (अध्यक्ष, लोकशिक्षण संस्था, वरोडा) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ब्रह्मदत्त पांडेय (सदस्य, लोकशिक्षण संस्था, वरोडा),सुवर्णरेखाताई पाटील, राहुल राखे हे उपस्थित होते. यावेळी श. राजू डाउले, हरिदास चौधरी, विठ्ठल फोपरे, कु. कटाईत, सौ. मंगला पोटे यांच्यासह इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

सामाजिक स्वास्थ्य व माझा विकसित भारत या संकल्पनांच्या पूर्ततेसाठी थोरमहापुरुषांचे विचार, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, मतदारांनी सावधतेने जनप्रतिनिधींची निवड करणे, पर्यावरणाचे योग्य प्रकारे रक्षण करणे, वेळोवेळी प्रत्येकाला सुचणाऱ्या युक्त्यांचा वापर करणे इत्यादी विविध मुद्द्यांवर मान्यवरांनी स्वयंसेवकांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात आरोग्य शिबिर व पशुनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, बौद्धिक सत्रात कॅटरिंग व्यवस्थापन व रोजगार संधी, संविधान अमृत महोत्सव, वाचन संकल्प महाराष्ट्राचा, डिजिटल साक्षरता, माझा विकसित भारत, मोबाईलचा वाढता वापर: सोयीचा की धोक्याचा? इत्यादी विषयावर बौद्धिक व्याख्याने, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आले आहेत. याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रमात दोन दिवस स्वयंसेवकांचे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच समाज प्रबोधनकारांचे मनोरंजनात्मक प्रबोधन कार्यक्रम तीन दिवस नियोजित आहेत. तसेच रोज सकाळी ८ ते ११ या वेळात श्रमदानाचे आयोजन केले आहे.या उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन डॉ. श्रीकांत पुरी यांनी केले, प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. रवींद्र शेंडे (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना) यांनी केला, तर आभार प्रदर्शन डॉ. तानाजी माने यांनी केले. या उद्घाटन कार्यक्रमाला मोखाळा ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांचे संपूर्ण सहकार्य मिळाले.

# रस्त्याचे बांधकाम अपूर्ण-तळेगाव टालाटुले ते एकुर्ली रोडची दयनीय अवस्था

**पुलगाव । प्रतिनिधी**

गेल्या वर्षापासून देवळी पुलगाव मतदारसंघातील तळेगाव टालाटुले ते एकुर्ली रोड या रस्त्याचे बांधकाम अद्यापही पूर्ण करण्यात आलेले नाही. रस्ता उखडलेला असून, गिट्टी बाहेर आली आहे, ज्यामुळे प्रवास अत्यंत धोकादायक झाला आहे. तळेगाव टालाटुले व एकुर्ली या गावातील विद्यार्थी शिक्षणासाठी अल्लीपूरला येत असतात. मात्र खराब रस्त्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय गावातील नागरिक व शेतकऱ्यांचे प्रवासही कष्टदायक ठरत आहे. रस्त्याची ही दयनीय अवस्था पाहता, सार्वजनिक वाहतुकीवर गंभीर परिणाम होत आहे.या समस्येबाबत अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या असूनही, अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. स्थानिक राजकीय नेते व अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने, नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.लोकांच्या सुरक्षिततेसाठी आणि दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी तळेगाव टालाटुले ते एकुर्ली रोडचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे.



# अनाधिकृत वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**वैजापूर । प्रतिनिधी**

जिल्हा छत्रपती संभाजी नगरमध्ये अनाधिकृत वाळू वाहतूक सध्या सर्व तालुक्यांमध्ये सुरू असून, त्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. पोलीस, महसूल आणि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त गस्त घालून वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची सूचना त्यांनी केली. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय सन नियंत्रण समितीची बैठक पार पडली, यामध्ये पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनीष दौंड, जिल्हा



खणीकर्म अधिकारी किशोर घोडके, वरिष्ठ भू वैज्ञानिक जीवन बेडवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गुरमे, उपअधीक्षक भूमी अभिलेख निलेश उंडे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी आर जी देसले यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.बैठकीत सांगण्यात आले की, जिल्ह्यात यावर्षी गौण खनिजाचे अवैध उत्खनन आणि वाहतूक केल्याप्रकरणी १७४ कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यात ३ कोटी ३३ लाख रुपये इतका दंड आकारला गेला असून, १ कोटी ९७ लाख ५३ हजार रुपये दंडाची वसुली करण्यात आली आहे. तसेच २३ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल केले गेले असून, १६७ वाहने आणि ४ यंत्रे जप्त करण्यात आली आहेत. जिल्ह्यात एकूण १०,०४६ ब्रास वाळू चार प्रमुख वाळू डेपोवर उपलब्ध आहे, त्यापैकी घरकुल लाभार्थ्यांसाठी ४७०१ ब्रास वाळू आणि शासकीय कामांसाठी ४३७३ ब्रास वाळू उपलब्ध आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी खदानीची मोजणी भूमी अभिलेख विभागामार्फत केली जावी आणि अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले. त्यांनी आणखी सांगितले की, विना क्रमांक हायवांना पकडून गुन्हे दाखल करावेत आणि रात्रीची गस्त सुरू ठेवावी.